# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## गंजगोलाईत वाहतुकीला अडथळा; गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ जुलै : शहरातील गजबजलेल्या गंजगोलाई परिसरात मिरची लाईन भागात वाहतुकीला अडथळा ठरेल, अशा पद्धतीने ऑटो-रिक्षा उभी करणाऱ्या ऑटोरिक्षाचालकाविरुद्ध गांधी चौक पोलिसांनी कारवाई केली आहे.

१५ जुलै रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास आरोपीने त्याची एमएच २४, एटी ९९३५ या क्रमांकाची ऑटोरिक्षा सार्वजनिक रस्त्याच्या मध्यभागी बेजबाबदारपणे उभी केली होती.

यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होऊन नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला होता.



### विविध वृत्त....

## स्मार्ट मिटरची मनसेने केली होळी




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ जुलै : महावितरणच्या स्मार्ट मिटर विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक झाली आहे. शहरातील महावितरण कार्यालयासमोर स्मार्ट मिटरची होळी करून सरकार व महावितरण विरोधात संताप व्यक्त करत स्मार्ट मिटर तात्काळ बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे.

महावितरणच्या वतीने सध्या स्मार्ट मिटरची सक्ती करण्यात येत असून स्मार्ट मिटरमुळे सामान्य नागरिकांना नाहक अधिकचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्यामुळे हे स्मार्ट मिटर तात्काळ बंद करावेत अन्यथा महावितरण आणि सरकार विरोधात भव्य जनआक्रोश मोर्चा काढण्याचा ईशारा यावेळी मनोज अभंगे व शिवकुमार नागराळे यांनी दिला आहे.

## जि. प. वेतन अपहार प्रकरणातील तिघांना अभय

तभा वृत्तसेवा

लातूर : जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात १ जानेवारी २०२५ ते ३१ मे २०२५ दरम्यान, ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रांतील कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा अपहार झाला. या प्रकरणात चार जणांचा सहभाग होता. यातील फक्त एकावर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने गुन्हा नोंद केला. इतर तिघांना सूट दिली. हा प्रकार आरोग्य कर्मचाऱ्यांना आवडला नाही. या प्रकरणात सर्व दोषींवर गुन्हे नोंद करून अदल घडवायला हवी होती. ही नामी संधी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने घालवली. वेतन अपहार झालेल्या कर्मचाऱ्यांनी अर्धवट कारवाई केल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. सर्वांनावर कारवाई होणे अपेक्षित होते. परंतु, जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने कचखाऊ भूमिका घेतल्याने इतर तिघांना अभय मिळाले. हे अभय का दिले, का जाणिवपूर्वक दिले, याबाबतीत उलटसुलट प्रतिक्रिया उमटत आहेत.

## वक्फ बोर्डाची मालमत्ता बचावासाठी स्वाक्षरी मोहीम

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ जुलै : शहरातील वक्फ बोर्डाच्या मालमत्तेवर

अनधिकृतपणे अतिक्रमण करण्यात येत असल्याचा आरोप करीत वक्फच्या मालमत्तांवरील अतिक्रमणे तातडीने थांबवावीत, या मागणीसाठी गंजगोलाई येथे मुस्लिम समाजातील सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत स्वाक्षरी मोहीम शुक्रवारी हाती घेतली आहे.

येथील वक्फ बोर्डाची मालमत्ता वाचविण्यासाठी जनजागृती आणि स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी हाता फलक घेऊन अनधिकृतपणे होणारे अतिक्रमण तातडीने थांबवावे, तसेच शासनाने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या प्रसंगी विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संस्था, संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर शहरात दर्जाहिन विकास कामांचा सपाटा..!

## विकास निधी खर्च करायचाय म्हणून हा प्रकार सुरु आहे की काय ? नागरिकांना पडतोय प्रश्न

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १९ जुलै : कधीकाळी मराठवाड्यात विकास कामांच्या बाबतीत अग्रेसर असणाऱ्या लातूर शहराची अवस्था आजमितीस अतिशय बकाल झाल्याचे दिसत आहे. सध्यस्थितीत शहराच्या विविध भागात छोटी मोठी विकास कामे सुरु असून त्या कामांचा दर्जा अतिशय हिन असल्याचे पाहताक्षणीच लक्षात येते. त्यामुळे ही विकास कामे पाहून सामान्य लातूरकरांतूनच आता विकास निधी खर्च करायचा आहे म्हणून ही ओबडधोबड अन् सुमार दर्जाची कामे केली जात आहेत की काय ? असा प्रश्र्न उपस्थित केला जात आहे.

लातूर शहर महानगरपालिकेच्या तिसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीत लातूरच्या मतदारांनी राज्यातील सत्ताधारी भाजप - महायुतीवर विश्र्वास न दर्शवता भारतीय राष्ट्रीय काँग्रेसलाविक्रमी बहुमताने सत्तास्थानी विराजमान केले. राज्यात आणि देशात भाजप - मित्र पक्षांची सत्ता असताना लातूरच्या मतदारांचा हा निर्णय काहीसा चुकलाच ,असे एकंदर परिस्थितीवरून पाहावयास मिळत आहे. सत्तेत असणाऱ्या पक्षाच्या हाती मनपाच्या चाव्या सोपविण्यात आल्या असत्या तर शहराचा विकासाला अजिबात खीळबसली नसती. विकास कामासाठी मोठ्या प्रमाणावर निधीचीआवश्यकता असते त्याकरिता सत्तेची नितांत सत्ता खूप महत्वाची असते, ही बाब लातूरच्या मतदारांना वेळ निघून गेल्यावर लक्षात येत आहे. लातूर शहर मनपातील कर्मचाऱ्यांना सुद्धा वेळेवर वेतन मिळत नाही. जेथे कर्मचाऱ्यांच्या वेतनाचीहीअडचण होते, तेथे विकास कामाच्या बाबतीत फारसे न बोललेलेच बरे.

आता पावसाळ्याचे दिवस आहेत. शहराच्या अनेक भागात रस्त्यावर खड्डे पडल्याने वाहनधारकांना वाहने चालविताना अक्षरशः सर्कस करावी लागते. त्याकरिता रस्त्यावरील खड्डे मुरूम टाकून बुजविण्याचे काम काही भागात केले गेले आहे. हे काम एवढ्या हलक्या दर्जाचे आहे की, एक दोन मोठे पाऊस होऊन गेल्यानंतर रस्त्यावरचे खड्डेपुन्हा अगोदर होते तसेच होऊन बसणार आहेत.

किमान मुरूम टाकल्यानंतर त्यावर रोड रोलर तरी फिरवून टाकलेला मुरूम दाबण्याचे काम संबंधित कंत्राटदाराने करायला हवे होते. फक्त खड्डे बुजवायलामुरूम टाकला का तर टाकला,असे सांगण्यासाठी आणि दाखवून देण्यासाठीचसदर काम केले गेल्याचे स्पष्ट दिसून येते. याकडे मनपा प्रशासनाने सूक्ष्म लक्ष देणे आवश्यक आहे. परंतु भ्रष्टाचाराच्या वाळविणे पोखरून टाकलेल्याप्रशासनाचे याकडे हेतुतः दुर्लक्ष होताना दिसते. शहराच्या विविध भागात हा प्रकार घडताना दिसत आहे. शहराच्या काही भागात पेव्हर ब्लॉक चे कामही केले जाताना पाहायला मिळते. या कामातही दर्जा कुठेही पाहायला मिळत नाही केवळ पेव्हर ब्लॉकचे काम केले का केले ? असे दाखवण्यापुरते केले जात आहे की काय ? असे एक ना अनेक प्रश्र्न सातत्याने उपस्थित केले जात आहेत.शहराच्या राजस्थान विद्यालयाच्या पाठीमागील गांधी नगर, रविंद्रनाथ टागोर नगर भागात सध्या पेव्हर ब्लॉकचेकाम सुरु आहे. या कामाचा आणि दर्जाचा सुतरामही संबंध नसल्याचे दृष्टीपथास येत आहे.

शहराच्या अनेक भागात अशा प्रकारचे काम यापूर्वीही केले गेले आहे. त्या कामाच्या दर्जाचीहीहीच अवस्था आहे. त्यामुळे अशा कामासाठी नागरिकांनीकराच्यारूपाने भरलेल्या पैशाचाअपव्यय करायचा अधिकार संबंधितांना कोणी दिला ? असाही संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. मनपा प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अशा दर्जाहिन कामांकडे तात्काळ लक्ष घालून संबंधित दोषींवर कारवाई करावी,अशी मागणी केली जात आहे.

## लातूर ग्रामीण शेत/पाणंद रस्ते योजनेच्या सहअध्यक्षपदी सुरज शिंदे यांची नियुक्ती

तभा वृत्तसेवा

लातूर दि.१९ जुलै : राज्य शासनाने नव्याने गठीत करण्यात आलेल्या मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजनेच्या लातूर ग्रामीण विधानसभा कार्यक्षेत्राच्या सहअध्यक्षपदी भाजपाचे सुरज शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली असून सदरील नियुक्ती करून काम करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले आहेत.



ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शेतीतील मशागतीची कामे वेळेत व्हावीत, शेतमालाची सुलभ वाहतूक सुनिश्र्चित करण्यासाठी बारमाही शेतरस्ते असणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे राज्यातील माहिती शासनाने मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना सुरू केली आहे. शासन निर्णयानुसार प्रत्येक विधानसभा क्षेत्र निहाय समिती गठीत करण्यात आली. लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्र समितीचे पदसिद्ध अध्यक्षपदी आ. श्री. रमेशआप्पा कराड आहेत.

मुख्यमंत्री बळीराजा शेत पांणद रस्ते योजनेच्या अंमलबजावणीत अधिक सुसूत्रता आणण्यासाठी शासन निर्णयात सुधारणा करण्यात आल्या असून समितीच्या कामकाजात मदतीसाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारसीनुसार भाजपाचे मुरुड मंडल अध्यक्ष श्री सुरज शिंदे यांची या समितीचे सहअध्यक्ष म्हणून राज्याचे महसूल मंत्री मा. चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी एका परिपत्रकानुसार नियुक्ती केली आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेच्या सहअध्यक्षपदी नियुक्ती करून काम करण्याची संधी दिल्याबद्दल सुरज शिंदे यांनी आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले आहेत. यावेळी जिल्हा परिषदेचे सदस्य महादेव साळुंखे, भाजपाचे मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, पंस सदस्य पांडुरंग बालवाड, पद्माकर चिंचोलकर, बाबासाहेब भिसे, हनुमंत गव्हाणे, भैरवनाथ पिसाळ, अशोक राठोड, संजय ठाकूर, वैभव मगर, सचिन लटपटे, शुभम खोसे, रवींद्र नागरगोजे, श्रीराम आदमाने, परमेश्र्वर माने, मुकुंद केसरी गोविंद नांदे, प्रशांत शिंदे, बालाजी गवळी, प्रशांत रायनोळे, आत्माराम शिंदे, अभिजीत पाटील यांच्यासह अनेक जण होते.

लातूर ग्रामीण मतदार संघात अद्यापपर्यंत कोणत्याही योजनेमधुन रस्त्यांची कामे झालेली नाही अश्या सर्व रस्त्यांची माहिती संकलीत करुन शेतकऱ्यांच्या रस्त्यांचे प्रश्र्न निकाली काढण्यासाठी कार्यकर्त्यांनी काम करावे कोणाचीही अडवणूक आणि पिळवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी असे आ रमेशआप्पा कराड यांनी यावेळी बोलून दाखवले.

## लातूर तालुक्यात सर्वात कमी ३६.३५ टक्के पेरणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ जुलै : एल निनोमुळे यंदा असमान पाऊस पडत आहे. त्यामुळे पेरणीही असमान झाली आहे. लातूर तालुक्यात सर्वात कमी ३६.३५ टक्के पेरणी झाली आहे. लातूर तालुक्याच्या आसपासच्या भागातही पेरण्या रखडल्या आहेत. जळकोटमध्ये सर्वाधिक पेरणी झाली सोमवारपासून हस्त नवीन नक्षत्र निघणार आहे. त्यामुळे या नक्षत्रात मोठा पाऊस पडण्याची शेतकऱ्याना अपेक्षा आहे. पावसाअभावी लांबलेल्या पेरण्या पुढील आठवड्यात पाऊस झाल्यास काहीअंशी पूर्ण होतील. उत्पादनात मात्र मोठी घट निर्माण होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत.

## प्लास्टिकमुक्त भारताचा संकल्प; नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वितरण



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ जुलै : आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी अभियानांतर्गत राबविण्यात येणार्या भारत मुक्त प्लास्टिक अभियान अंतर्गत भारतीय जनता पक्षाच्या भाजपा प्रवक्त्या तथा नगरसेविका प्रेरणाताई होनराव यांच्या वाढदिवसानिमित्त बार्शी रोडवरील पाण्याच्या टाकी परिसरात नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वितरण करण्यात आले. वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमातून साजरा करत पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

यावेळी नागरिकांना प्लास्टिकला नकार - कापडी पिशवीला होकार हा संदेश देत प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे पर्यावरण आणि मानवी आरोग्यावर होणार्या गंभीर दुष्परिणामांची माहिती देण्यात आली. प्लास्टिकमुळे माती, पाणी व हवा प्रदूषित होते, जनावरे व पक्ष्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो, नाले तुंबून पूरस्थिती निर्माण होते. तसेच प्लास्टिक जाळल्याने विषारी वायू तयार होऊन कर्करोग, दमा व इतर श्र्वसनविकारांचा धोका वाढतो. सूक्ष्म प्लास्टिक अन्न व पाण्यातून मानवी शरीरात जाऊन दीर्घकालीन आरोग्य समस्या निर्माण करू शकते. त्यामुळे प्रत्येकाने कापडी पिशवीचा वापर करून पर्यावरण रक्षणात योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमास बांधकाम उद्योजक नागनाथ गीते, माजी मुख्याध्यापक भागवत भोसले, सुनील ताडमडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी पर्यावरण संवर्धनासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित करत प्लास्टिकमुक्त भारत घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घ्यावा, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांच्या पुढाकाराने आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी अभियानांतर्गत करण्यात आले. उपस्थित नागरिकांनी प्लास्टिकचा वापर टाळून कापडी पिशवीचा स्वीकार करण्याचा आणि पर्यावरण संरक्षणासाठी सक्रिय सहभाग घेण्याचा संकल्प केला. वाढदिवस केवळ उत्सव म्हणून नव्हे, तर समाज आणि पर्यावरणासाठी उपयुक्त कार्य करून साजरा करूया, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# 'शाहू'चे 'नीट' परीक्षेत घवघवीत यश

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : नीट-युजी-२०२६ परीक्षेचा निकाल गुरूवार दि. १६ जुलै रोजी रात्री जाहीर झाला. यामध्ये राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा घवघवीत यश संपादन केले आहे.



आतापर्यंत प्राप्त झालेल्या ८५० विद्यार्थ्यांच्या निकालानुसार मयुर गणेश आघाव या विद्यार्थ्याने (६८३ गुण) एआयआर-२१७ इतर मागासवर्गीय (ओबीसी) संवर्गातून एआयआर-५४ वा प्राप्त केला आणि महाविद्यालयातून सर्वप्रथम येण्याचा मान मिळवला. वास्तवसिंह नारायणराव वडणे (६७० गुण) एआयआर-५३२ व ईडब्ल्यूएस संवर्गातून एआयआर-२७ वा व महाविद्यालयातून सर्वद्वितीय, शंतनू रामदास दोडके (६७० गुण) एआयआर-५४८ व ईडब्ल्यूएस संवर्गातून एआयआर-३० वा प्राप्त करून महाविद्यालयातून सर्वतृतीय आला. अनुष्का सुनिल कांबळे (६२७गुण) अनुसूचित जाती संवर्गातून ९७ वा रँक प्राप्त करून प्रथम आली आहे तर देवांश रमेश जाधव (५८९ गुण) अनुसूचित जमाती संवर्गातून एआयआर-१०२ मिळवून महाविद्यालयातून प्रथम आला आहे तर कु. श्रावणी संतोष पोकळे (६५० गुण) एआयआर-१४७७ मिळवून मुलीत सर्वप्रथम आली.

महाविद्यालयात नीट-युजी परीक्षेच्या पुर्नतयारीसाठी इन्स्पायर (रिपीटर) बॅचचे विशेष वर्ग दरवर्षी चालविले जातात. आनंद शामराव शेंडगे (६५५गुण) एआयआर-११६१ प्राप्त करून महाविद्यालयातून प्रथम आला आहे. महाविद्यालयातून ६५० पेक्षा अधिक गुण प्राप्त करणारे ९ विद्यार्थी, ६०० पेक्षा ५६, ५५० पेक्षा १७३, ५०० पेक्षा ३५७ व ४५० पेक्षा अधिक गुण प्राप्त करणारे ५०३ विद्यार्थी आहेत. देशातील प्रख्यात अशा एम्स महाविद्यालयात किमान ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना निश्र्चित प्रवेश मिळू शकतो.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व राजर्षी शाहू ज्युनिअर सायन्स कॉलेज शालेय समिती अध्यक्ष डॉ. अजय जाधव, सचिव बी. बी. ठोंबरे, सहसचिव डॉ. शिवाजीराव सुर्यवंशी, सहसचिव उद्धवराव पाटील व इतर सर्व संचालक, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, सीईटी-सेलचे संचालक प्रा. दिलीप देशमुख, उप-प्राचार्य सुरेश तांबडे, मुख्य-समन्वयक प्रा. स्वप्निल राजेमाने, व एम्स बॅचचे समन्वयक विनोद झरीटाकळीकर, इतर सर्व समन्वयक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

### विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य || शाळेसमोर विनाकारण रेंगाळणे पडणार महागात

## दामिनी पथकाची करडी नजर; ८५ जणांवर कारवाई




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ जुलै : लातूर जिल्ह्यात शाळा, महाविद्यालये व विविध कोचिंग क्लासेस नियमितपणे सुरू झाले असून विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत लातूर पोलीसांकडून विशेष प्रतिबंधात्मक मोहीम राबविण्यात येत आहे. शैक्षणिक संस्थांच्या परिसरात विनाकारण रेंगाळणे, विद्यार्थिनींचा पाठलाग करणे, त्यांची छेड काढणे अथवा त्यांना मानसिक त्रास देणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी दामिनी पथकाला दिले आहेत. त्यानुसार दामिनी पथकाने ८५ जणांवर कारवाई केली आहे.

दामिनी पथकाकडून दररोज सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत शाळा, महाविद्यालये, कोचिंग क्लासेस तसेच संवेदनशील परिसरात नियमित गस्त घालण्यात येत आ हे. अचानक तपासणी, संशयितांवर लक्ष ठेवणे तसेच विद्यार्थिनींशी संवाद साधून त्यांच्या सुरक्षिततेबाबत विश्र्वास निर्माण करण्याचे कामही दामिनी पथक या पथकाकडून सातत्याने केले जात आहे.

या विशेष मोहिमेदरम्यान शैक्षणिक संस्थांच्या परिसरात विनाकारण रेंगाळणाऱ्या व संशयास्पद वर्तन करणाऱ्या एकूण ८५ जणांवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११० व ११७ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. यापुढेही अशा प्रकारचे गैरवर्तन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

लातूर पोलीसांचे सर्व विद्यार्थिनी, पालक व शैक्षणिक संस्थांना आवाहन आहे की, शाळा, महाविद्यालय किंवा कोचिंग क्लासेस परिसरात कोणताही तरुण विनाकारण त्रास देत असल्यास, पाठलाग करत असल्यास किंवा संशयास्पद हालचाली करत असल्यास त्याची त्वरित माहिती द्यावी. अशा घटना लपवून न ठेवता आपत्कालीन क्रमांक ११२ वर संपर्क साधावा. तसेच परिसरात गस्त घालणाऱ्या दामिनी पथकाकडे, अथवा जवळच्या पोलीस ठाण्यात तात्काळ तक्रार नोंदवावी.

महिलांच्या व विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. सुरक्षित शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी लातूर पोलीस कटिबद्ध असून अशा विशेष मोहिमा नियमितपणे सुरू राहणार आहेत, असा संदेश लातूर पोलिसांनी दिला आहे.

## संक्षिप्त...

### स्वभावाला बदलण्याची ताकत आध्यात्मात आहे ब्र.कु. महानंदा बहनजी

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १९ जुलै : स्वभावाला बदलण्याची ताकत आध्यात्मात आहे असे बहुमोल विचार ब्र.कु. महानंदा बहनजी यांनी व्यक्त केले.

एस.टी.कॉलनी नळेगाव रोड मलकापुर येथील नव्यानेच उभारण्यात आलेल्या विघ्नेश्र्वर गणेश मंदिर, केदारेश्र्वर शिवालय मंदिर येथे मुर्ती प्राण प्रतिष्ठापणा व कलशारोहन सोहळ्यानिमित्य आयोजित शिवलिला ग्रंथाचे पारायण प्रसंगी ब्र..कु.ईश्र्वरिय विश्र्व विद्यालय उदगीर केंद्राच्या संचालिका ब्र.कु.महानंददा बहनजी यांनी प्रवचनात व्यक्त केले.

प्रवचनात अपले विचार व्यक्त करताना बहनजी म्हणाल्या की,बुध्दी जिवी प्राणी फक्त मणूष्य आहे परंतू मनूष्यात श्रेष्ठ कर्म करण्याची ताकत कमी झाली आहे. विचार बुरसटलेले आहेत त्यामुळे मनुष्य दु:खी होतो. संस्कारीत बनण्यासाठी ज्ञानाची गरज असुन ज्ञानात मनूष्याला बदलण्याची ताकद आहे परंतू बदलून घ्याची ईच्छा असली पाहिजे ,स्वभावाला बदलण्याची ताकत आध्यात्मात आहे, ईश्र्वराला मानण्याबरोबर ईश्र्वराने दिले विचाराचे अनुकरण करणे महत्वाचे आहे. विचार करण्याची पध्दतीवर आपले सुख दु:ख अवलंबून आहे आपले विचारच माणसाला सुख आणी दु:ख देते म्हणून विचार सकारात्मक ठेवा,विविध ग्रथाचे वाचन करा, चिंतन करा चिंतनाने मनाला श्रेष्ठ विचाराची ताकद मिळते असे सांगून जिवनात ईश्र्वर चितनाचा सप्ताह सतत ठेवा अपेक्षा कमी ठेवा आनंदी जीवन जगा स्वत:आनंदी रहा व दुसर्याला आनंद द्या असे बहुमोल विचार ब्र.कु.महानंदा बहन यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी विचार पीठावर ब्र.कु. मिराबहन ,शि.भ.प. उध्दव महाराज हैबतपुरे उपसस्थित होते. शिवलिला मृत ग्रंथाचे पारायणास दोनशे महिला भाविकांनी सहभाग नोंदवला आहे.महाआरती होऊन कर्यक्रमाची सांगता झाली.

## निळकंठेश्वर साखर कारखान्याच्या विशेष सर्वसाधारण सभेत विकास प्रकल्पांना मंजुरी



तभा वृत्तसेवा

औसा दि. १९ जुलै : दररोज ६० हजार लिटर क्षमतेचा डिस्टिलरी प्रकल्प, दररोज ५ टन क्षमतेचा संपीडित जैववायू (सीबीजी) प्रकल्प, ३० टन क्षमतेचा सेंद्रिय खत व पोटॅश निर्मिती प्रकल्प, तसेच २० मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारणी-मालकी-संचालन-हस्तांतरण तत्त्वावर उभारण्याच्या ठरावास औसा तालुक्यातील किल्लारी येथील निळकंठेश्वर साखर कारखान्याच्या सभासदांनी एकमताने मंजुरी दिली.

औसा तालुक्यातील किल्लारी येथील निळकंठेश्वर साखर कारखान्याची विशेष सर्वसाधारण सभा शुक्रवार दि.१७ रोजी झाली.यावेळी आ. अभिमन्यू पवार यांनी शेतकरी सभासदांनी संवाद साधला त्यावेळी प्रवीण फडणवीस,शेखर सोनवणे, संतोष बेंबडे,सुभाष जाधव, रमेश माने,प्रकाश पाटील,राम पाटील, गोविंद भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रकल्पांमुळे कारखान्याची आर्थिक क्षमता अधिक भक्कम होण्यास मदत होणार असून, शेतकरी सभासदांच्या हिताला चालना मिळणार आहे.याचबरोबर कारखान्याच्या सर्वांगीण व दीर्घकालीन विकासाला बळ मिळेल, असा विश्र्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या विशेष सर्वसाधारण सभेत कारखान्याची प्रगती, शेतकरी सभासदांच्या हिताचे निर्णय आणि आगामी वाटचालीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सभासदांनी मांडलेल्या सूचना, अपेक्षा आणि विविध विषयांवरील मते जाणून घेत आमदार अभिमन्यू पवार यांनी संवाद साधला. यावेळी बोलताना आमदार अभिमन्यू पवार म्हणाले की, अनेक वर्षे बंद असलेला निळकंठेश्वर साखर कारखाना केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्यामुळे पुन्हा सुरू करण्यात यश आले आहे. सध्या कारखाना पूर्ण क्षमतेने कार्यरत असून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा कारखाना पुन्हा उपलब्ध झाला आहे. गत गाळप हंगाम यशस्वीपणे पूर्ण झाल्याने कारखान्याला पुन्हा गतवैभव प्राप्त होत असल्याचे आ.पवार यांनी सांगितले. कारखान्याच्या पुनरुज्जीवनामुळे किल्लारी परिसरातील व्यापारी, लघुउद्योजक आणि इतर पूरक व्यवसायांना चालना मिळाली आहे .तर स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीलाही गती मिळाल्याचे आ.पवार यांनी स्पष्ट केले. आगामी काळातही कारखान्याचा सर्वांगीण विकास आणि शेतकरी सभासदांचे हिताला प्राधान्य देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## मोटारीच्या वायरच्या चोरी प्रकरणी दोघांविरुद्ध चाकूर पोलिसांत तक्रार दाखल

तभा वृत्तसेवा

चाकूर दि. १९ जुलै : चाकूर तालुक्यातील आनंदवाडी शिवारातील शेतकऱ्याच्या शेतातील मोटारची विद्युत वायर चोरी केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध चाकूर पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आनंदवाडी येथील विष्णुदास प्रल्हाद पासमे वय ५८ वर्षे, व्यवसाय-शेती यांनी चाकूर पोलीस ठाण्यात शेतातील विद्युत वायर चोरी गेल्याची तक्रार दिली.सविस्तर माहिती अशी की,ता.१८ जुलै २०२६ रोजी दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास शेतातील मोटार बंद पडल्याने विष्णूदास पासमे तळ्यावर मोटार सुरू करण्यासाठी गेले असता, आनंदवाडी गावातीलच नारायण निवृत्ती पस्तापूरे व महादू बाबुराव चिटलेवाड हे दोघे मोटारीची विद्युत वायर घेऊन जात असल्याचे दिसले असल्याचा आरोप करण्यात आला आहे..

त्यानंतर विष्णूदास यांनी मोटार सुरू करण्याचा प्रयत्न केला असता ती सुरू झाली नाही.तेंव्हा इकडे तिकडे पाहीले असता मोटारीची वायर कापून नेल्याचे निदर्शनास आले.त्यामुळे विष्णूदास यांनी विद्युत वायर चोरी गेल्याचे लक्षात आले.चोरी गेलेल्या वायरची किंमत अंदाजे ४,००० रूपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

सदरील प्रकरणी चाकूर पोलीस ठाण्यात एनसीआर क्रमांक ०७५८/२०२६ नोंदविण्यात आला असून भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३०३(२) व ३(५) अंतर्गत अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.पोलिसांनी फिर्यादीला पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी संबंधित न्यायालयात दाद मागण्याचा सल्ला दिला आहे.

## पावसासाठी ग्रामदैवतांना साकडे

### आचवला येथे दिंडी, जलाभिषेक अन् सामुदायिक महाप्रसाद



तभा वृत्तसेवा

देवणी दि. १९ जुलै : खरीप हंगामातील पेरणीनंतरही पावसाने पाठ फिरवल्याने आचवला (ता. देवणी) परिसरातील शेतकरी चिंतेत सापडले आहेत. पेरणीनंतर एकदाही समाधानकारक पाऊस न झाल्याने पिके करपू लागली असून दुबार पेरणीचे संकट ओढवण्याची भीती निर्माण झाली आहे. या पार्श्र्वभूमीवर ग्रामदैवतांनी पावसाची कृपा करावी, या श्रद्धेतून शनिवारी (दि. १८ जुलै) आचवला येथील समस्त ग्रामस्थांनी पारंपरिक 'पुर' साजरा करत ग्रामदैवतांना साकडे घातले.

पहाटेपासूनच गावात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते. टाळ, मृदंग आणि वीणेच्या गजरात गावातून भव्य दिंडी काढण्यात आली. गावातील विविध मंदिरांमध्ये जाऊन ग्रामदैवतांचा जलाभिषेक करण्यात आला. प्रत्येक देवतेला पाणी अर्पण करून वेळेवर आणि भरपूर पाऊस पडावा, अशी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

या दिंडीत तरुण शेतकऱ्यांसह ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. अनेकांच्या हातात घागर, कळशी व पाण्याची भांडी होती. श्रद्धा आणि एकोप्याचे दर्शन घडविणाऱ्या या उपक्रमात महिलांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. संपूर्ण गाव एकत्र येऊन पावसासाठी प्रार्थना करत असल्याचे भावनिक चित्र या निमित्ताने पाहायला मिळाले.

यंदा वेळेवर पेरणी झाल्यानंतर पावसाने मोठा खंड दिल्यामुळे उगवलेली पिके धोक्यात आली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मनात दुबार पेरणीची भीती वाढली असून आर्थिक संकटही गडद होत आहे. अशा कठीण परिस्थितीत निसर्गाने साथ द्यावी आणि लवकर चांगला पाऊस व्हावा, या आशेने ग्रामस्थांनी हा पारंपरिक धार्मिक विधी पार पाडला.

या कार्यक्रमासाठी ज्ञानेश्र्वर कारभारी, तानाजी शिंदे, मधुकर लखन गावे, ज्ञानोबा बेद्रे, यादव बिरादार यांच्यासह ग्रामस्थांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय श्रीरंग सूर्यवंशी यांनी पाहिले.

जलाभिषेक आणि धार्मिक कार्यक्रमानंतर संपूर्ण गावासाठी सामुदायिक महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. खीर, भात आणि कडीचा प्रसाद सर्व ग्रामस्थांनी एकत्र बसून ग्रहण केला. सामाजिक ऐक्य, परंपरा आणि श्रद्धेचे दर्शन घडविणारा हा उपक्रम ग्रामस्थांसाठी प्रेरणादायी ठरला.

## लेबर कॉलनी परिसरात धूर फवारणीची मागणी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ जुलै : शहरातील लेबर कॉलनी परिसरात डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. पाऊस पडत नसल्याने गटारी तुंबल्या आहेत.

रिमझिम पावसामुळे काही ठिकाणी पाण्याचे डबके साचले आहेत. या डबक्यांत डोसोत्पत्ती मोठ्या प्रमाणात होत आहे. डासांसोबतच माशांचाही प्रादुर्भाव वाढला आहे.

त्यामुळे लेबर कॉलनी परिसरात धुर फवारणी करावी, उघड्यावर पडलेला कचरा उचलावा, घंटागाडी नियमित येईल, अशी व्यवस्था करावी, आदी मागण्या स्थानिक नागरिकांनी केल्या आहेत.


### टी. सी. हरवली आहे

बापूराव अशोकराव भोसले या नावाची टि.सी. हरवली आहे. लातूर येथून चाकूर कडे दि. ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता बसने लातूर येथून चाकूर कडे प्रवास करीत असताना शाहू विद्यालय, शेळगावची बापूराव अशोकराव भोसले या नावाची दहावी पासची टि. सी. व इतर शैक्षणिक साहित्य हरवले आहेत.

टि. सी. व कागदपत्रे सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क साधावे.

बापूराव अशोकराव भोसले मु. पोस्ट. शेळगाव ता.चाकूर जि.लातूर

मो. ८७८८०३३६००


## महसूल अधिकारी, कर्मचारी निवासस्थानांचे आज भूमिपूजन



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. १९ जुलै : अहमदपूर येथील लातूर ते नांदेड या राष्ट्रीय महामार्गावर मरशिवणी रस्त्यावरील शासकीय वसतिगृहाजवळ महसूल विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी आधुनिक व सुसज्ज अशा नवीन निवासस्थानांचे बांधकाम करण्यात येणार आहे. या प्रस्तावित इमारतीचे भूमिपूजन सोमवार, २० जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यक्रमास लोकप्रतिनिधी, वरिष्ठ शासकीय अधिकारी व विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवासस्थानाची अडचण दूर करण्यासाठी शासनाने सुमारे १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

या निधीतून वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांसाठी ८ निवासस्थाने, वर्ग -३ च्या कर्मचाऱ्यांसाठी ८ निवासस्थाने, वर्ग -२ च्या अधिकाऱ्यांसाठी २ निवासस्थाने आणि वर्ग -१ च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी २ निवासस्थाने अशी एकूण २० हून अधिक घरे बांधली जाणार आहेत.

## जे नसे शेतकऱ्यांच्या ललाटी ते करतात तलाठी

### भ्रष्टाचारी तलाठी, मंडळ अधिकारी यांच्या विरोधात जन आक्रोश मोर्चाचे आयोजन

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १९ जुलै : शासकीय सेवेत कर्मचारी तलाठी व मंडळ अधिकारी कर्तव्य बजावत असताना नियमाचे पायमल्ली करुन निर्णय घेत आहेत. त्याच बरोबर दाखल केलेल्या प्रस्तावावर वेळ काढून प्रत्यक्षपणे पाहणी करीत नाहीत व अप्रत्यक्षपणे पैसे मागणी करुन तसेच पैसे कमावण्याच्या हेतूने तलाठी नियमबाह्य कामकाज करीत असल्यामुळे शेतक-याचे हाल आणि न भरुन येणारे नुकसान होत आहे. एका तलाठयाची चुक शेतक-याला -सुधारण्यासाठी बारा वर्ष लागतात जे नसे शेतक-याच्या ललाठी ते करतात तलाठी या म्हणी प्रमाणेच सध्या शिरुर अनंतपाळ तलाठ्यांचा कारभार आहे. तालुक्यातील तलाठ्यांच्या चुकीच्या निर्णयामुळे अनेक शेतक-यांना अत्महत्या करण्याची वेळ आली आहे.

त्याचेच एक उदाहरण म्हणजे शिरूर अनंतपाळ येथील अमर (राहुल)संजय येंजने या शेतकऱ्या संदर्भात काही दिवसांपूर्वी आर. एस.पाटील या तलाठ्याने पिडीत शेतकऱ्यांची जमीन परस्पर दुसऱ्याच्या नावावर ओढल्यामुळे शेतकऱ्याने महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य, जिल्हा अधिकारी , तहसीलदार, यांच्या कडे लेखी तक्रार दाखल केली होती. त्यांच्या तपासाअंती संबंधित तलाठी दोषी आढळल्याने तहसीलदारांनी त्यांचा तात्काळ पदभार काढून घेतला, परंतु पिडीत शेतकऱ्याला वाटते की,ही शिक्षा अपुरी आहे. त्यासाठी या भ्रष्ट तलाठ्याला सेवेतून कायमस्वरूपी बडतर्फ करावे असे शेतकरी अमर (राहुल)येंजने यांचें म्हणणे आहे. तहसीलदार शिरूर अनंतपाळ यांना सादर केलेल्या निवेदनात संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यावर नियमबाह्य पद्धतीने कारभार केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

> जमीन हा शेतकऱ्यांचा जिव आहे अशा प्रकारे परस्पर फेर फार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई नाही झाली तर सर्व सामान्य शेतकऱ्यांचा महसूल यंत्रनेवरचा विश्वास उडेल
> रयत क्रांती संघटना मराठवाडा अध्यक्ष
> (शिवाजीराव पेठे)

जमिनी संदर्भातील प्रस्तावावर वेळेत निर्णय न घेणे, प्रत्यक्ष पाहणे टाळणे, कामासाठी वारंवार हेलपाटे मारायला लावणे तसेच पैशाची मागणी करून शेतकऱ्याचे आर्थिक पिळवणूक केलाचा दावा निवेदनात केला आहे. शेतकऱ्याच्या म्हणण्यानुसार महसूल विभागातील चुकीच्या निर्णयाचा परिणाम थेट शेती व शेतकऱ्यांच्या उपजवीकेवर होत आहे. साधी दुरुस्ती किंवा नोंद बदलण्यासाठी वर्षानुवर्ष हेलपाटे मारावे लागते आहे.

प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे शेतकरी अक्षरशा हवालदील झाले आहेत. कामे करून घ्यायचे असतील तर पैसे मोजा नाहीतर वर्षांनुवर्षे कार्यालयात खेटे मारा अशी संतप्त भावना शेतकऱ्यांमधून ऐकायला मिळत आहे. या पार्श्र्वभूमीवर संबंधित अधिकाऱ्यांच्या गैरकारभाराची सखोल चौकशी करून दोशीवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अन्यथा आंदोलनाची तीव्रता वाढवण्यात येईल असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.यासाठी ३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महात्मा बसवेश्वर चौक शिरूर अनंतपाळ येथुन तहसील कार्यालयापर्यंत भव्य जन आक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

या मोर्चात विविध शेतकरी संघटनेचे नेते, विविध पक्षांचे कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित राहणार असल्याचे दिसून येते आहे.

## 'कोचिंग क्लासेस टिचर फेडरेशन'च्या राज्य उपाध्यक्षपदी प्रा.डॉ. शादूल पठाण



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. १९ जुलै : 'कोचिंग क्लासेस टिचर फेडरेशन न्ड सोशल फोरम ऑफ महाराष्ट्र' या राज्यस्तरीय संघटनेच्या राज्य उपाध्यक्ष पदी प्रा. डॉ. शादुल पठाण यांची नुकतीच निवड करण्यात आली. त्यांच्या या नियुक्तीबद्दल अहमदपूरमधील कोचिंग क्लासेस संचालक बांधवांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे त्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रा. डॉ. शादुल पठाण यांच्या निवडीने अहमदपूरच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे. या सत्कार समारंभाप्रसंगी अहमदपूरमधील विविध कोचिंग क्लासेसचे संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. येथील कोचिंग क्लास फोरम च्या वतीने पुष्पगुच्छ देऊन आणि सन्मानचिन्ह देऊन डॉ. पठाण यांना सन्मानित करण्यात आले.

अहमदपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांनी या नियुक्तीची दाखल घेत प्रा. डॉ. शादुल पठाण यांचे अभिनंदन करून सत्कार केला . एका शिक्षकाची राज्यस्तरीय पदावर झालेली निवड ही अहमदपूरकरांना अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले.

आपल्या सत्काराला उत्तर देताना प्रा. डॉ. शादुल पठाण म्हणाले की, राज्य स्तरावर मिळालेली ही जबाबदारी मी निष्ठेने पार पाडणार आहे. अहमदपूरच्या सर्व संचालक बांधवांनी जो विश्र्वास दाखवला त्याबद्दल मी सर्वांचा मनपूर्वक ऋणी आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्याने कोचिंग क्लास शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी मी कटिबद्ध राहीन. आणि

अहमदपूर च्या शैक्षणिक पॅटर्न मी प्रमुख साक्षीदार आहे शैक्षणिक परिवर्तन घडवून पुन्हा एकदा अहमदपूर चे नाव शिक्षण क्षेत्रात सुवर्ण अक्षरांनी कोरले जावे या साठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## डॉ.कदम,जाधव संपादित पुस्तकाचा संदर्भग्रंथ म्हणून विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश

तभा वृत्तसेवा

उदगीर दि.१९जुलै: छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयातील साहित्यिक,शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रामध्ये कार्यरत असणारे,तसेच मराठी विश्र्वकोश निर्मिती मंडळ महाराष्ट्र राज्य मुंबईचे सदस्य डॉ.नरसिंग कदम आणि सहसंपादक प्रा.अजित जाधव यांनी संपादित केलेला महानुभाव संप्रदाय स्वरूप आणि विशेष या पुस्तकाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर या विद्यापीठाच्या बी.ए. तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमात संदर्भग्रंथ म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. तशा निवडीची माहिती त्यांना मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.सर्जेराव जिगे यांनी दिली. अभ्यास मंडळाच्या सर्व सदस्यांनी अध्यक्षाच्या मार्गदर्शनाखाली ही निवड केलेली आहे. यापूर्वी प्रा.डॉ.नरसिंग कदम यांच्या महात्मा फुले : साहित्य आणि विचार, महात्मा फुलेंचे कार्य : शोध आणि बोध या दोन संपादित पुस्तकांचा उस्मानिया विद्यापीठ हैदराबाद या विद्यापीठाच्या एम.ए.च्या अभ्यासक्रमात संदर्भ ग्रंथ म्हणून समावेश झालेला आहे.त्यांचे अनेक राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये ७० पेक्षा जास्त शोधनिबंध प्रकाशित झालेले आहेत. विविध वर्तमानपत्रातून त्यांचे ६० पेक्षा जास्त लेख प्रकाशित झालेले आहेत. पीएचडीचे ते संशोधन मार्गदर्शक आहेत. विविध समित्यावर ते कार्य करत आहेत.तर प्रा.अजित पुंडलिकराव जाधव स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण केंद्राचे व्याख्याते आहेत. सामाजिक चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्रभर विविध विषयावर प्रबोधन केले. त्यांचे संतांचा खरा इतिहास, सत्यशोधकी आणि ग्रामीण साहित्य ही पुस्तके आहेत. विविध विषयांवर ३५ पेक्षा जास्त शोध निबंध प्रकाशित झाले.राज्यस्तरीय उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार व रोटरी क्लब ऑफ इंटरनॅशनल यांच्या वतीने देशाचे शिल्पकार या पुरस्काराने ते सन्मानित आहेत.

## बिझनेस लोन चे आमिष दाखवून पाच सिम कार्ड च्या माध्यमातून फसवणूक

### पोर्टल वरील तक्रारीच्या आधारे १२ नागरिकांची ४.५० लाखांची ऑनलाइन फसवणूक करणाऱ्या आरोपी विरुद्ध शिरूर अनंतपाळ पोलिसात गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १९ जुलै : सायबर गुन्हेगारांकडून विविध प्रकारचे आमिष दाखवून नागरिकांची आर्थिक फसवणूक करण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत, या पार्श्र्वभूमीवर लातूर जिल्हा पोलीस सायबर गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी सातत्याने कार्यरत असून, विविध ऑनलाइन पोर्टलवर प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा नियमित आढावा घेत संबंधितांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसीआरपीवर प्राप्त झालेल्या तक्रारीची छाननी करण्यात आली. या छाननीदरम्यान मोबाईल क्रमांक ८४४६३७७५०० तसेच इतर काही मोबाईल क्रमांकां विरुद्ध एकूण १२ तक्रारी प्राप्त झाल्याचे आढळून आले. सखोल पडताळणी केली असता महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील नागरिकांची एकूण १४,५०,०८६/ इतक्या रकमेची ऑनलाइन फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले.प्राप्त तक्रारींमध्ये अहमदनगर जिल्ह्यातील मिरजगाव येथील चार,पुणे जिल्ह्यातील नारायणगाव, पिंपरी, लोणी काळभोर, चिखली व विश्रांतवाडी येथील पाच, सांगली जिल्ह्यातील मिरज येथील एक, मुंबईतील कस्तुरबा येथील एक तसेच ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथील एका नागरिकाचा समावेश असून, या सर्वांकडून मिळून १४,५३,०८६/- इतकी रक्कम फसवणुकीद्वारे उकळण्यात आली.

पोलीस तपासादरम्यान शुभम रहीशचंद्र पिचारे रा. येरोळ, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर याने ही फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले. आरोपी हा सन २०२१-२०२२ मध्ये अल्ट्रस टेक्नॉलॉजी या कॉल सेंटरमध्ये कार्यरत होता. त्या अनुभवाचा गैरफायदा घेत त्याने नागरिकांना बिझनेस लोन मंजूर करून देतो' असे खोटे आमिष दाखवून प्रक्रिया शुल्क, फाईल चार्जेस, इन्शुरन्स, जीएसटी आदी विविध कारणे सांगत पैसे जमा करण्यास भाग पाडले. नागरिकांकडून पैसे मिळवण्यासाठी आरोपीने एकूण पाच वेगवेगळ्या सिमकार्डाचा वापर केल्याचे तपासात उघड झाले आहे.

याप्रकरणी शिरूर अनंतपाळ पोलीस स्टेशनचे पोलीस अमलदार विनय उबाळे यांच्या फिर्यादीवरून शिरूर अनंतपाळ पोलीस ठाणे येथे गुन्हा क्रमांक १५५/२०२६ अन्वये कलम ३१८(४) भारतीय न्याय संहिता गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक अनंत भंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक उमेश रायबोळे हे करत आहेत.

> **(सात वर्षांपर्यंत शिक्षेची तरतूद)**
> भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) अंतर्गत फसवणुकीद्वारे मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ मिळविणाऱ्या आरोपीस सात वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा, तसेच दंडाची शिक्षा होऊ शकते. त्यामुळे ऑनलाइन कर्ज, गुंतवणूक, नोकरी किंवा इतर कोणतेही आर्थिक आमिष दाखवून पैसे मागणाऱ्या कात्तींवर विश्र्वास ठेवू नये, असे आवाहन लातूर पोलिसांनी केले आहे.

> **(लातूर पोलिसांचे नागरिकांना आवाहन)**
> ऑनलाइन कर्ज मंजुरीसाठी कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या खात्यावर आगाऊ रक्कम जमा करू नका. मोबाईलवर आलेल्या लिंक, संदेश किंवा कॉलवर विश्र्वास ठेवण्यापूर्वी त्यांची खातरजमा करा संशयास्पद व्यवहार झाल्यास अथवा फसवणुकीचा प्रयत्न झाल्यास तात्काळ सायबर हेल्पलाईन क्रमांक १९३० वर संपर्क साधावा किंवा, पोर्टलवर तक्रार नोंदवावी, त्वरित तक्रार केल्यास फसवलेली रक्कम परत मिळण्याची शक्यता वाढते. सायबर गुन्हेगारांवर कठोर कारवाईबरोबरच नागरिकामध्ये जनजागृती करून अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस सातत्याने कार्यरत असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# युद्ध-आपत्तीमध्ये मानवरहित बचाव यंत्रणा

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

आजपर्यंत युद्ध, नैसर्गिक आपत्ती किंवा समुद्रातील दुर्घटना यामध्ये जीव वाचवण्यासाठी नेहमीच माणसालाच धोक्यात जावे लागत असे. एखादे विमान कोसळले, जहाज बुडाले किंवा भूकंपामुळे लोक अडकले तर बचाव पथके स्वतःचा जीव धोक्यात घालून मदत करत असत. मात्र कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित यंत्रणा आणि रोबोटिक्स यांच्या संगमामुळे हे चित्र झपाट्याने बदलत आहे. उद्याच्या जगात माणूस निर्णय घेईल, पण सर्वांत धोकादायक ठिकाणी सर्वप्रथम पोहोचतील ती मानवरहित यंत्रे ! याचे एक ऐतिहासिक उदाहरण नुकतेच जगासमोर आले. होर्मुझ सामुद्रधुनीजवळ एक लष्करी हेलिकॉप्टर दुर्घटनाग्रस्त झाले. दोन सैनिक समुद्रात अडकले होते. अशा वेळी बचावासाठी दुसरे हेलिकॉप्टर किंवा जहाज पाठवण्याची अपेक्षा होती. परंतु घटनास्थळी पोहोचले ते सुमारे चोवीस फूट लांबीचे स्वयंचलित नौकायान. या नौकेने कोणत्याही चालकाविना समुद्रात अडकलेल्या सैनिकांचा शोध घेतला आणि सुरक्षितपणे बाहेर काढले. लष्करी इतिहासातील ही पहिली अशी घटना होती, जिथे पूर्णपणे स्वयंचलित नौकेने प्रत्यक्ष बचाव मोहीम यशस्वी केली. या तंत्रज्ञानामागे भारतीय वंशाचे अभियंता विभव आळतेकर यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. भारतीय बुद्धिमत्ता आज केवळ माहिती तंत्रज्ञानापुरती मर्यादित नसून ती जागतिक सुरक्षाव्यवस्थेच्या नव्या अध्यायालाही दिशा देत आहे, याचा हा अभिमानास्पद पुरावा आहे. या घटनेचे महत्त्व केवळ दोन सैनिकांचे प्राण वाचवण्यात नाही. खरा बदल म्हणजे बचाव आणि युद्ध व्यवस्थापनाच्या संपूर्ण तत्त्वज्ञानात होत असलेली क्रांती. भविष्यात संकटाच्या ठिकाणी सर्वप्रथम माणूस नव्हे तर यंत्र पाठवले जाईल. त्यामुळे मानवी जीवितहानी कमी होईल, निर्णय अधिक वेगाने घेतले जातील आणि मोहिमांची यशस्विताही वाढेल.

आज युद्धाचे स्वरूप वेगाने बदलत आहे. पूर्वी रणांगणावर सैनिक, रणगाडे आणि लढाऊ विमाने दिसत असत. आता त्यांची जागा स्वयंचलित ड्रोन, बुद्धिमान रोबो आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रणाली घेत आहेत. भविष्यात समुद्रातील खाणी शोधणे, शत्रूच्या क्षेत्रात प्रवेश करणे, जखमी सैनिकांना बाहेर काढणे किंवा विषारी वातावरणात मदतकार्य करणे ही सर्व कामे मानवरहित यंत्रांद्वारे केली जातील. सायबर युद्ध आणि डिजिटल गुप्तहेरगिरी हेही भविष्यातील संघर्षाचे महत्त्वाचे आयाम ठरणार आहेत. उद्याची युद्धे केवळ रणांगणावर लढली जाणार नाहीत, तर संगणक जाळे, उपग्रह व्यवस्था, वीज वितरण प्रणाली, बँकिंग नेटवर्क आणि दळणवळण यंत्रणांवरही हल्ले होतील. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सायबर प्रणाली शत्रूच्या हालचालींचे विश्लेषण करतील, संशयास्पद घुसखोरी ओळखतील आणि काही सेकंदांमध्ये प्रतिकारात्मक उपाययोजना करतील. स्वयंचलित ड्रोन, उपग्रह आणि सेन्सर नेटवर्क सीमाभागांवर सतत लक्ष ठेवून गुप्त माहिती गोळा करतील. भविष्यातील गुप्तहेर कदाचित एखादा मनुष्य नसून बुद्धिमान रोबो, सूक्ष्म ड्रोन किंवा कृत्रिम बुद्धिमत्तेवर चालणारी डिजिटल प्रणाली असेल. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेसाठी सैनिकांइतकेच सायबर तज्ज्ञ, डेटा वैज्ञानिक आणि कृत्रिम बुद्धिमत्ता अभियंते महत्त्वाचे ठरणार आहेत. माहितीचे संरक्षण करणारा, सायबर हल्ले रोखणारा आणि डिजिटल क्षेत्रात वर्चस्व निर्माण करणाराच उद्याच्या जागतिक स्पर्धेत आघाडीवर राहील.

नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनातही या तंत्रज्ञानाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. भूकंपानंतर ढिगाऱ्याखाली अडकलेले लोक शोधण्यासाठी लहान रोबोटिक यंत्रे वापरली जातील. पूरग्रस्त भागात स्वयंचलित नौका अन्न, औषधे आणि मदत सामग्री पोहोचवतील. जंगलातील आगीमध्ये अग्निशमन दलाआधी ड्रोन परिस्थितीचे विश्लेषण करतील. पूर, चक्रीवादळ किंवा भूस्खलन यांसारख्या घटनांमध्ये मानवी मदतकार्य अधिक सुरक्षित आणि परिणामकारक



होईल. कृत्रिम बुद्धिमत्ता या संपूर्ण व्यवस्थेचा मेंदू ठरणार आहे. हजारो सेन्सर्सकडून मिळणारी माहिती, उपग्रहांद्वारे मिळणारी छायाचित्रे, हवामानाचा अंदाज आणि प्रत्यक्ष परिस्थिती यांचे विश्लेषण करून यंत्रे काही सेकंदांमध्ये निर्णय घेऊ शकतील. माणसाला जिथे काही मिनिटे लागतील, तिथे कृत्रिम बुद्धिमत्ता काही क्षणांमध्ये पर्याय सुचवेल. यामध्ये इंटरनेट ऑफ थिंग्ज, प्रगत संवेदक, उपग्रह तंत्रज्ञान, संगणकीय दृष्टी, यंत्र शिक्षण आणि अतिवेगवान संप्रेषण प्रणाली यांचा मोठा वाटा असेल. प्रत्येक यंत्र एकमेकांशी संवाद साधेल आणि एकत्रितपणे कार्य करेल. त्यामुळे संपूर्ण बचाव मोहीम अधिक समन्वयित आणि प्रभावी बनेल. भारतासाठी ही मोठी संधी आहे. आपल्या देशात जगातील सर्वोत्तम अभियंते, संशोधक आणि तंत्रज्ञान तज्ज्ञ आहेत. संरक्षण, आपत्ती व्यवस्थापन आणि सार्वजनिक सुरक्षेसाठी स्वदेशी मानवरहित यंत्रणा विकसित करण्याची क्षमता भारताकडे आहे. समुद्रकिनारे, पर्वतीय प्रदेश, पूरग्रस्त भाग आणि शहरी आपत्ती यासाठी विशेष भारतीय उपाय विकसित करता येतील. यामुळे 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेला नवी दिशा मिळेल.

शिक्षणक्षेत्रालाही याचा विचार करावा लागेल. विद्यार्थ्यांना केवळ संगणक वापरणे पुरेसे ठरणार नाही, तर कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, डेटा विश्लेषण, सायबर सुरक्षा आणि स्वयंचलित प्रणालींचे ज्ञान आवश्यक असेल. भविष्यातील रोजगार, उद्योग आणि राष्ट्रीय सुरक्षा या सर्व क्षेत्रांमध्ये या कौशल्यांची मागणी वाढणार आहे. तथापि, या तंत्रज्ञानाबरोबर नैतिक आणि कायदेशीर प्रश्नही उभे राहतील. यंत्रांनी घेतलेल्या निर्णयांची जबाबदारी कोणाची, चुकीचा निर्णय झाल्यास उत्तरदायित्व कोण स्वीकारणार, मानवी नियंत्रण किती असावे या प्रश्नांची उत्तरे शोधणे तितकेच आवश्यक आहे. तंत्रज्ञानाने मानवतेची सेवा करावी, तिची जागा घेऊ नये, हा मूलभूत सिद्धांत येथे कायम ठेवावा लागेल. होर्मुझ सामुद्रधुनीतील ती बचाव मोहीम भविष्यातील जगाची एक झलक आहे. उद्याच्या युद्धांमध्ये, समुद्री दुर्घटनांमध्ये, भूकंपांमध्ये आणि पुरांमध्ये सर्वप्रथम धावून येणारे कदाचित मानव नसतील<bha>;</bha> ती असतील बुद्धिमान यंत्रे. मानव त्यांच्या मागे उभा असेल, मार्गदर्शन करत असेल, पण धोका पत्करणारे आणि संकटात उतरून काम करणारे सैनिक, नौका, ड्रोन आणि रोबो हे मानवरहित असतील. मानवजातीच्या इतिहासात हा एक नवा टप्पा आहे. जिथे तंत्रज्ञान केवळ सुविधा देत नाही, तर जीव वाचवते आणि त्या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी भारतीय बुद्धिमत्ता, नवकल्पना आणि दूरदृष्टी उभी आहे. उद्याच्या जगात युद्ध जिंकण्यापेक्षा जीव वाचवणे अधिक महत्त्वाचे ठरेल आणि त्या कार्यात मानवरहित यंत्रणाच मानवतेची सर्वात मोठी साथीदार ठरणार आहे.

आजच्या काळात गुप्तहेरगिरी केवळ एखाद्या देशात गुप्तहेर पाठवण्याइतकी मर्यादित राहिलेली नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता, सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स, उपग्रह तंत्रज्ञान आणि इंटरनेटमुळे गुप्त माहिती गोळा करण्याच्या पद्धती पूर्णपणे बदलल्या आहेत. काही सेंटीमीटर आकाराचे ड्रोन, अत्याधुनिक कॅमेरे, ध्वनी संवेदक, उष्णता ओळखणारी उपकरणे आणि उपग्रहांमधून मिळणारी उच्च-गुणवत्तेची छायाचित्रे यांचा वापर करून हजारो किलोमीटर दूर असलेल्या भागांवर सतत नजर ठेवता येते. भविष्यात पक्ष्यांच्या आकाराचे ड्रोन, कीटकांसारखी सूक्ष्म यंत्रे आणि समुद्रातील स्वयंचलित निरीक्षण यंत्रणा गुप्त माहिती संकलनात महत्त्वाची भूमिका बजावतील. सायबर गुप्तहेरगिरी हे आणखी एक प्रभावी शस्त्र बनत आहे. शत्रुराष्ट्रांच्या संगणक प्रणालींमध्ये प्रवेश करून संवेदनशील माहिती मिळवणे, औद्योगिक रहस्ये चोरणे, संरक्षण क्षेत्रातील माहिती हस्तगत करणे किंवा महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर नजर ठेवणे हे सर्व संगणकांच्या माध्यमातून केले जात आहे. अनेकदा एखादा सायबर हल्ला किंवा माहितीची चोरी वर्षानुवर्षे लक्षातही येत नाही. त्यामुळे डेटा हेच नवीन युगातील सोने बनले आहे. सामाजिक माध्यमेदेखील आधुनिक युद्ध आणि गुप्तहेरगिरीचे प्रभावी साधन ठरत आहेत. फेसबुक, एक्स, इन्स्टाग्राम, युट्युब आणि इतर व्यासपीठांवरील माहितीचे विश्लेषण करून लोकांची मते, भावना, सामाजिक प्रवाह आणि राजकीय कल समजून घेता येतात. कृत्रिम बुद्धिमत्ता लाखो संदेश, छायाचित्रे आणि व्हिडिओंचे विश्लेषण करून जनमतावर परिणाम करणाऱ्या मोहिमा ओळखू शकते किंवा स्वतः अशा मोहिमा राबवू शकते. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

# आता शिक्षकांनी पालक व्हावे

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

जयपूरमधील ९ वर्षांच्या अमायराच्या आत्महत्येची हृदयद्रावक घटना आपल्या शिक्षण व्यवस्थेवर आणि समाजावर अनेक प्रश्नचिन्हं निर्माण करते. एका चिमुकलीने शाळेच्या चौथ्या मजल्यावरून उडी घेऊन जीवन संपवले. कारण तिला शाळेत होणाऱ्या छळाला सामोरे जावे लागले आणि तिच्या तक्रारींकडे शिक्षकांनी दुर्लक्ष केले. ही घटना दुर्दैवी तर आहेच; त्याचबरोबर आपल्या मुलांना सुरक्षित आणि भावनिक आधार देण्यास आपण कुठे कमी पडत आहोत, याचा आरसा आहे. या घटनेने पुन्हा एकदा हा विचार करायला लावला आहे की, शिक्षकांनी केवळ ज्ञानदाते न राहता, विद्यार्थ्यांसाठी पालकांसारखे आधारस्तंभ बनणे किती महत्त्वाचे आहे.

आपल्या भारतीय संस्कृतीत शिक्षणाला नेहमीच अत्यंत पवित्र मानले गेले आहे. गुरुकुल परंपरेत गुरू हे केवळ शिक्षक नव्हते, तर विद्यार्थ्यांचे पालक, मार्गदर्शक आणि मित्रही होते. विद्यार्थी गुरुकुलात राहून शिक्षण घेत असत आणि गुरू त्यांना केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे, तर जीवन जगण्याची कला प्रदान करत, नैतिक मूल्यांनी त्यांचे जीवन भरून टाकत आणि त्या जोडीला सामाजिक जबाबदाऱ्याही शिकवत असत. गुरू-शिष्याचे नाते हे केवळ औपचारिक नव्हते तर ते प्रेम, विश्वास आणि आदरावर आधारित होते. गुरू आपल्या शिष्याला स्वतःच्या मुलाप्रमाणे वागवत असत आणि शिष्याच्या प्रत्येक अडचणीत त्याच्या पाठीशी उभे राहत असत.

आजच्या शिक्षण व्यवस्थेत मात्र हे चित्र पूर्णपणे बदलले आहे. शाळांची संख्या वाढली आहे, आधुनिक सुविधांनी युक्त इमारती उभ्या राहिल्या आहेत, पण मुलांच्या मनात सुरक्षिततेची भावना कमी झाली आहे. शिक्षकांवर अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा आणि परीक्षांचे निकाल सुधारण्याचा दबाव इतका वाढला आहे की, त्यांना विद्यार्थ्यांच्या भावनिक गरजांकडे लक्ष द्यायला वेळच मिळत नाही. परिणामी, शाळा हे केवळ माहिती मिळविण्याचे ठिकाण बनले आहे, भावनिक आधाराचे नाही.

अमायराच्या घटनेत असे समोर आले की, तिने अनेकदा तिच्यावर होणाऱ्या छळाबद्दल शिक्षकांना सांगितले होते, पण तिच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करण्यात आले. ही काय फक्त अमायराची गोष्ट नाही. अनेक शाळांमध्ये मुलांना होणाऱ्या त्रासाकडे, विशेषतः मानसिक छळाकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. यामागे अनेक कारणे असू शकतात. एका शिक्षकाला अनेक



विद्यार्थ्यांची जबाबदारी सांभाळावी लागते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणे कठीण होते. काही शिक्षकांमध्ये मुलांच्या भावनिक गरजा समजून घेण्याची संवेदनशीलता नसते किंवा त्यांना तसे प्रशिक्षण मिळालेले नसते. त्यांना वाटते की, मुलांच्या लहानसहान तक्रारींकडे दुर्लक्ष करणे योग्य आहे. मला एक गोष्ट कळत नाही की, एखादी स्त्री मुलीच्या गंभीर तक्रारीकडे दुर्लक्ष कशी करू शकते? ती आई नाही का? नसली तरी बाई नाही का? मातृसुलभ हृदय तिच्याकडे नाही का?

शिक्षक आणि पालक यांच्यात योग्य संवाद नसल्यामुळे मुलांच्या समस्या वेळीच लक्षात येत नाहीत. त्यामुळे हा संवाद वाढणं आवश्यक आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे काही वेळा शालेय प्रशासन अशा गंभीर समस्यांकडे दुर्लक्ष करते, ज्यामुळे शिक्षकांनाही यावर कारवाई करण्याची प्रेरणा मिळत नाही. मागे एका हॉस्टेलमध्ये काही सिनियर मुलं लहान मुलांना गुंडांसारखे मारत असल्याचा व्हिडीओ समोर आला होता. आता तर शिक्षक होमवर्क म्हणून कलमा देऊ लागले आहेत. शाळेच्या प्रशासनाने याकडे लक्ष दिलं पाहिजे आणि शैक्षणिक पात्रतेसह कॅरेक्टर सर्टिफिकेटही शिक्षकांकडून घेतलं पाहिजे.

लक्षात घ्या, पूर्वीही मुलांमध्ये चिडवाचिडवी, भांडणे होत असत, पण त्याचे स्वरूप इतके गंभीर नव्हते. आता मात्र सायबर बुलिंग, मानसिक छळ आणि शारीरिक हिंसाचाराच्या घटना वाढल्या आहेत. लहान मुले मोठ्या माणसांसारखी वागू लागली आहेत, त्यांच्यात संयमाचा अभाव दिसतो आहे आणि त्यांना आपल्या कृतींचे परिणाम समजत नाहीत. सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांच्या अतिवापरामुळे मुलांच्या मानसिकतेत मोठे बदल झाले आहेत. त्यांना पटकन राग येतो, ते निराश होतात आणि अनेकदा चुकीचे निर्णय घेतात. या गंभीर परिस्थितीत शिक्षकांनी केवळ अभ्यासक्रम शिकवणारे यंत्र बनून न राहता, विद्यार्थ्यांसाठी पालकांसारखे बनणे ही काळाची गरज आहे. याचा अर्थ असा नाही की, शिक्षकांनी पालकांची जागा घ्यावी, तर याचा अर्थ असा आहे की, त्यांनी विद्यार्थ्यांच्या भावनिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घ्यावी. शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी मोकळा संवाद साधला पाहिजे. मुलांना त्यांच्या समस्या, भीती आणि चिंता शिक्षकांसोबत शेअर करता येतील, असा विश्वास त्यांना दिला पाहिजे. शिक्षकांनी मुलांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले पाहिजे आणि त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिक्षकांनी मुलांच्या भावनांबद्दल संवेदनशील असले पाहिजे. एखाद्या मुलाला त्रास होत असेल, तर त्याला सहानुभूती दाखवून मदत केली पाहिजे. प्रत्येक मुलाची पृष्ठभूमी, मनःस्थिती आणि परिस्थिती वेगळी असते, हे शिक्षकांनी लक्षात ठेवले पाहिजे.

शाळेत होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या बुलिंग किंवा छळाविरुद्ध शिक्षकांनी कठोर भूमिका घेतली पाहिजे. अशा घटनांकडे दुर्लक्ष न करता, त्यावर त्वरित कारवाई केली पाहिजे. मुलांना सुरक्षित वातावरणाची हमी दिली पाहिजे. शिक्षकांनी पालकांशी नियमित संपर्क साधला पाहिजे. मुलांच्या प्रगतीबद्दल, त्यांच्या वर्तणुकीतील बदलांबद्दल आणि त्यांच्या समस्यांबद्दल पालकांशी चर्चा केली पाहिजे. शिक्षक आणि पालक यांच्यातील समन्वयामुळे मुलांच्या समस्या वेळीच सोडवता येतात. केवळ पुस्तकी ज्ञान न देता, शिक्षकांनी मुलांना नैतिक मूल्ये, सामाजिक जबाबदाऱ्या आणि जीवन कौशल्ये शिकवली पाहिजेत. त्यांना इतरांचा आदर करायला, सहानुभूती दाखवायला आणि समस्या सोडवायला शिकवले पाहिजे. शिक्षकांना मुलांच्या मानसिक आरोग्याबद्दल आणि बुलिंगसारख्या समस्यांना कसे हाताळावे, याबद्दल योग्य प्रशिक्षण दिले पाहिजे. त्यांना समुपदेशनाचे मूलभूत ज्ञान असणे आवश्यक आहे.

अमायरासारख्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी आपण सर्वांनी, विशेषतः शिक्षकांनी आणि शालेय प्रशासनाने, गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. शाळा हे मुलांसाठी दुसरे घर असले पाहिजे, जिथे त्यांना सुरक्षित, प्रेमळ आणि आधार देणारे वातावरण मिळेल. शिक्षकांनी केवळ ज्ञानदाते न राहता, विद्यार्थ्यांसाठी पालकत्वाचा आधार द्यावा. त्यांच्या मनात विश्वासाची ज्योत पेटवावी; जेणेकरून कोणतीही अमायरा पुन्हा कधीही एकटेपणाने आपले जीवन संपवण्याचा विचार करणार नाही. ■

writerjayeshmestry@gmail.com

## रविवारची पत्रे

### सत्संगाचे महत्त्व - जीवनाला मिळालेली नवी दिशा

माणसाचा जन्म झाला की त्याच्यासोबत एक प्रवास सुरू होतो. हा प्रवास सुख-दुःख, यश-अपयश, चांगले-वाईट यामधून वाटचाल करीत असतो. या प्रवासात कोणती वाट निवडायची, कोणता निर्णय घ्यायचा, हे ठरवणारी सर्वांत मोठी शक्ती म्हणजे 'संगत'. संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे — "संगेन जायते भावः" म्हणजे संगतीने माणसाचे भाव, विचार आणि जीवन घडते.

चांगल्या लोकांची संगत म्हणजेच 'सत्संग'. सत् म्हणजे सत्य, चांगुलपणा, ज्ञान आणि संग म्हणजे सहवास. थोडक्यात सत्याचा, धर्माचा, ज्ञानाचा आणि सद्गुणांचा सहवास म्हणजे सत्संग. आजच्या झगमगाटाच्या जगात सत्संग हाच एक दिवा आहे, जो आपल्या जीवनाला नवी दिशा देतो.

**सत्संगाची संकल्पना आणि स्वरूप :** सत्संग म्हणजे फक्त मंदिरात जाऊन प्रवचन ऐकणे, एवढेच मर्यादित नाही. सत्संगाची अनेक रूपे आहेत :

**१. संत-सज्जनांचा सहवास :** ज्ञानेश्वर, तुकाराम, विवेकानंद, गांधीजी यांसारख्या महापुरुषांचे विचार वाचणे आणि आचरणात आणणे.

**२. गुरूंचे मार्गदर्शन :** जो आपल्याला अंधारातून प्रकाशाकडे नेतो तो गुरू. त्यांच्याशी असलेला संवाद म्हणजे सत्संग.

**३. सद्ग्रंथ वाचन :** भगवद्गीता, दासबोध, ज्ञानेश्वरी यांसारखी पुस्तके वाचणे हा देखील एकप्रकारचा सत्संगच आहे.

**४. चांगल्या मित्रांशी मैत्री :** जे आपल्याला प्रगतीकडे, चांगल्या कामाकडे प्रोत्साहित करतात अशी मंडळी.

सत्संग म्हणजे बाहेरून ज्ञान घेणे नाही, तर आतल्या मनाला घासून-पुसून स्वच्छ करणे आहे.

**सत्संगाचे महत्त्व-**

**अ) चारित्र्यनिर्मिती होते :** मातीला जसा कुंभार आकार देतो, तसे सत्संग माणसाला घडवतो. एकटा माणूस भरकटू शकतो, पण चांगल्या लोकांच्या सोबतीने त्याला योग्य-अयोग्य कळते. फुलासंगे मातीस वास लागे. संतांच्या चरित्रातून आपल्याला त्याग, सेवा, प्रामाणिकपणा शिकायला मिळतो. म्हणूनच म्हणतात, 'लोखंडाला परिसाचा स्पर्श झाला की ते सोने होते.

**ब) जीवनाला ध्येय आणि दिशा मिळते :** आजचा तरुण संभ्रमात आहे. काय करावे, करीअर कसे निवडावे, हे कळत नाही. अशावेळी सत्संगातील विचार मनाला स्थैर्य देतात. 'तुझ्यातील क्षमता ओळख' ही जाणीव सत्संगातूनच येते. स्वामी विवेकानंदांना रामकृष्ण परमहंसांच्या सत्संगाने जीवनाची नवी दिशा मिळाली आणि त्यांनी जगाला भारताचा संदेश दिला.

**क) मानसिक शांती आणि बळ मिळते :** अपयश, ताण-तणाव, नैराश्य हे आजकालच्या जीवनाचे भाग आहेत. अशावेळी सत्संगातील एक वाक्य देखील डोंगराएवढे बळ देते. 'हे दिवसही जातील', 'कर्म करत रहा, फळाची अपेक्षा करू नका' ही गीतेची शिकवण सत्संगातूनच मनात रुजते. त्यामुळे मन शांत होते आणि आत्मविश्वास वाढतो.

**ड) वाईट सवयी सुटतात :** वाईट संगत माणसाला व्यसन, आळस, चोरीकडे नेते. पण सत्संगात गेल्यावर माणसाला या गोष्टींची लाज वाटू लागते. त्याला समजते की आयुष्य हे फक्त मौज-मस्तीसाठी नाही तर काहीतरी चांगले करण्यासाठी आहे. म्हणूनच तुरुंगातही सत्संगाचे वर्ग घेतले जातात, जेणेकरून गुन्हेगार सुधारू शकतील.

**भारतीय संस्कृती सत्संगावरच उभी आहे.**

**१. रामायण :** वनवासात रामाला ऋषी-मुनींचा सत्संग लाभला. त्यांच्याकडून त्यांनी धर्म, नीती शिकली.

**२. महाभारत :** अर्जुन गोंधळला होता तेव्हा श्रीकृष्णाच्या सत्संगाने त्याला 'गीता' मिळाली. तीच गीता आजही कोट्यवधी लोकांना दिशा देते.

**३. संत परंपरा :** महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय हा सत्संगाचेच उदाहरण आहे. लाखो लोक पंढरीच्या वारीत जातात, तुळस डोक्यावर घेऊन स्त्रिया आणि भक्त टाळ, चिपळ्यांच्या गजरात पायी जातात. एकत्र भजन करतात, कीर्तन ऐकतात. तिथे मिळणाऱ्या एका तासाच्या कीर्तनाने वर्षभराचे बळ मिळते.

**छत्रपती शिवाजी महाराज :** त्यांना जिजाऊंचा आणि संतांचा सत्संग लाभला होता. त्यामुळेच त्यांनी 'हिंदवी स्वराज्य'चे स्वप्न पाहिले आणि ते पूर्ण केले.

**सत्संग कसा करावा-**

१. आठवड्यातून किमान १ तास सत्संगासाठी काढा. कीर्तनाला जा, चांगल्या लोकांना भेटा.

२. सद्ग्रंथ वाचायला हवेत : रोज १० मिनिटे गीता, ज्ञानेश्वरी वाचा.

३. चांगले ऐका, पाहा : मोबाईलवर वेळ वाया घालवण्याऐवजी चांगले व्हिडीओ बघा. संगतीने माणूस घडतो आणि सत्संगतीने माणूस सावरतो. जर जीवनाला खरी दिशा हवी असेल, तर सत्संगाला आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवा.

**मंगला डहाके**/भंडारा

### हा सुखसोहळा स्वर्गी नाही !



आषाढ मास सर्वांसाठी आनंद पर्वणी घेऊन येतो. ग्रीष्मात झालेला वसुंधरेचा दाह शमविण्यासाठी मृगधारा बरसतात. पुढे चाहूल लागते शेतीच्या कामाची. निसर्ग वरदहस्ताने काळ्यामातीवर मेहरबान होतो आणि भूमीवर सर्वत्र हिरवीगार चादर विखुरली जाते. गाव, शिवार, वाड्या - मळ्यातील बीजांकुर उमलू लागतात. त्याची परिणती म्हणून शेतकरी राजा आनंदात न्हाऊन जातो. श्रमपूर्तीच्या समाधानाची शिदोरी घेऊन शाश्वत सुखाची वाट धरतो ती वाट म्हणजे पंढरीच्या वारीची.

पंढरीची वारी हे आपल्या संस्कृतीचे महावैभव, आनंद, सुख, समाधानाचा महासोहळा. वारीत वर्ण, वंश, जात, धर्म, स्त्री, पुरुष असा कुठलाही भेद पाळला जात नाही. इथे सर्वांचं एकच अवीट नातं असतं ते देव म्हणजे भक्तांचे. पंढरीच्या या वारीसाठी कुणालाही निमंत्रण पाठविले जात नाही. प्रपंचातला वेळातला वेळ काढून वर्षातून एकदा तरी पंढरीची वारी करावी आणि ती अनुभवून इतरांना सांगावी असाच अनमोल वारीचा सोहळा आहे. माघ, चैत्र, आषाढी आणि कार्तिकी अशा चार वाऱ्या पंढरपूरचे वारकरी करतात, परंतु या सर्व वारींमध्ये आषाढी वारीला विशेष महत्त्व आहे. टाळ मृदंगाच्या गजरात, वेणू आणि चिपळ्यांच्या मंजुळ स्वरात, माय माउलींच्या डोक्यावर तुळशी वृंदावन, फुगड्यांचा फेर, कपाळी बुक्क्यांचा टिळा, गळ्यात तुळशी माळा, अनवाणी पायाने चालणारे आबालवृद्ध. कंठात विठ्ठल... विठ्ठल... मंत्र, अंतःकरणात विठ्ठलाचे अपार प्रेम साठवून वारकऱ्यांची पावले झपाट्याने मजल दरमजल करीत पंढरपूर गाठतात.

पंढरपूर असे तीर्थक्षेत्र आहे की देव दर्शनाचा लाभ हा थेट चरणावर मस्तक ठेवून घेतला जातो. अशाच समचरणांच्या दर्शनाच्या अभिलाषेपायी वारकरी व्याकुळ असतात. चंद्रभागेत स्नान करून जगतजननी रुक्मिणीमाता, भक्त पुंडलिक, चोखामेळा, नामदेव पायरी, कान्होपात्रेचे दर्शन घेऊन ते धन्य होतात. ऐसा लाखो वैष्णव भक्तांचा सोहळा चंद्रभागेच्या वाळवंटी भरतो. असा रम्य सोहळा बघण्यासाठी देश-विदेशातील कानाकोपऱ्यांतून भक्त येतात. या सोहळ्यांचे साक्षीदार बनतात आणि त्यांचे जीवन धन्य होऊन जाते. अशा सोहळ्यांचे वर्णन अनेक संतांनी करून ठेवले आहे.

**हा सुख सोहळा स्वर्गी नाही**
**सुखालागी करीशी तळमळ ।**
**तरी तू जाय एकवेळ पंढरीसी॥**
**पंढरीचे सुख नाही कोण्या धामा**
**पंढरीसी जाय तू एक वेळ ।**
**मग तू अवघाची सुखरूप होशी ।।**

अशी अनेक वचने संतांच्या शब्दातली आहेत.

**शशिकांत तोटे**/९१३०८३५४५८

### तुकाराम मुंढे आणि दूध

बातमी होती की तुकाराम मुंढे अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त झाल्यानंतर दुधाचे संकलन कमी झाले. म्हणजे स्पष्ट होते की मोठ्या प्रमाणात भेसळ होत होती. आता काही लोक सांगतील की उन्हाळ्यात दूध कमी होते. पण ही आजची माहिती आहे. साधारण जुलै ते ऑक्टोबर या काळात सर्वांत जास्त दूध उत्पादन होत असते. कारण जनावरांना हिरवा चारा मिळतो. त्यामुळे दूध वाढते. अन सध्या दुधाचा तुटवडा जाणवतो आहे. सणासुदीच्या काळात दुधाचा खप जास्त असतो तेव्हा हा आकडा अजून मोठा ठरू शकतो.

आता विचार करा ५ लाख लिटर दूध (म्हशी, गाय) चा ६० रुपये विक्रीदर धरला तर रोजचे ३ कोटी रुपये आणि वर्षाचे साधारण ११०० कोटी रुपये हे लोकांच्या खिशातून या दूध उत्पादकांनी लुटला. हा धंदा किती वर्षे सुरू आहे ह्याचा विचार करता येत नाही. भारतातील हा आकडा किती मोठा असेल? हे दूध लहान मुले, वयोवृद्ध पितात. त्यामुळे प्रकृतीवर परिणाम होऊन आजार होतात ते वेगळे. त्यावर होणारा खर्च वेगळा. तुकाराम मुंढे आयुक्त झाले नसते तर हा गोरखधंदा कधी उघडकीस आलाच नसता.

यावर उपाय करता येईल. प्रत्येक प्रक्रिया करणारा शेकडो पुरवठादारांकडून दूध घेतो. त्याची नोंद असते. कारण त्यांना पैसे द्यावे लागतात. प्रत्येकाकडे किती दूध कमी आले आणि ते कोणी टाकले हे समजू शकेल. त्यातून कोण भेसळ करतो ते समजू शकते. ज्याचे दुधाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटले तो गुन्हेगार असू शकतो. दुसरे त्यांचा पुरवठा आणि विक्री तपासावी. तसेच किती दूध इतर पदार्थ करण्यासाठी वापरले ते पण विचारात घ्यावे. कोण भेसळ करतो ते समजेल. त्यांना कठोर शिक्षा व्हावी.

**प्रदीप महाबळे**/पुणे

### 'नीट' पेपरफुटीचा मुखवटा आणि लडाख आंदोलन

आजचे युग हे माहितीचे युग असले, तरी या माहितीचा वापर करून देशात संभ्रम आणि असंतोष कसा पसरवला जाऊ शकतो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे सध्या सुरू असलेली काही आंदोलने आणि त्यामागील प्रचार होय. लडाखमधील सोनम वांगचुक यांच्या जंतरमंतर येथील उपोषण समाजमाध्यमांवर जाणीवपूर्वक 'नीट' पेपरफुटीच्या प्रकरणाशी जोडण्याचा प्रयत्न होत आहे. हा केवळ योगायोग किंवा संभ्रम नसून, यामागे एक अत्यंत पद्धतशीर आणि धोकादायक राजकीय अजेंडा कार्यरत असल्याचे आता स्पष्ट होत आहे.

'नीट' परीक्षा आणि पेपरफुटी हा देशातील कोट्यवधी तरुण विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि त्यांच्या भावनांशी खेळणारा विषय आहे. या विषयामुळे विद्यार्थ्यांमध्ये आधीच नैराश्य आणि संतापाचे वातावरण आहे. आंदोलक आणि त्यांच्या पाठीशी असणाऱ्या शक्तींनी नेमका याच संवेदनशील मुद्याचा 'आडोसा' घेतला आहे. लडाखच्या भौगोलिक आणि स्थानिक मागण्यांचा मूळ विषय बाजूला ठेवून, देशातील तरुणांना रस्त्यावर उतरवणे, त्यांच्या मनात व्यवस्थेबद्दल तीव्र असंतोष निर्माण करणे आणि याद्वारे संपूर्ण देशात अराजकता व अशांतता माजवणे, हाच यामागील मुख्य हेतू आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर पुळका असल्याचा आव आणून स्वतःचा छुपा अजेंडा रेटण्याचा हा प्रयत्न अत्यंत निंदनीय आहे.

लडाख येथील हे आंदोलन सुरुवातीला लडाखला संविधानाच्या 'सहाव्या अनुसूची' अंतर्गत विशेष दर्जा मिळावा आणि तिथल्या स्थानिक संस्कृतीचे रक्षण व्हावे या गोंडस नावाखाली सुरू झाले. परंतु, हळूहळू या आंदोलनाने अत्यंत आक्रमक रूप धारण केले. केंद्र सरकारवर दबाव आणण्यासाठी थेट राजधानी दिल्ली रोखण्याचा प्रयत्न करण्यात आला. सीमाभागातील संवेदनशीलतेचा गैरफायदा घेत सरकारला वेठीस धरण्याच्या या भूमिकेमुळेच कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आणि वांगचुक यांना प्रशासनाकडून अटक करण्यात आली. लोकशाही मार्गाने हक्क मागणे वेगळे, पण देशात अस्थिरता निर्माण करण्यासाठी आंदोलनाचा शस्त्र म्हणून वापर करणे पूर्णपणे वेगळे आहे.

या संपूर्ण आंदोलनात सर्वांत चिंताजनक बाब म्हणजे सोनम वांगचुक यांनी चीनबाबत केलेली बेछूट वक्तव्ये. 'चीनने आक्रमण केल्यास आम्ही त्यांना मार्ग दाखवू,' अशा प्रकारची विधाने थेट देशाच्या सुरक्षेला आणि सार्वभौमत्वाला आव्हान देणारी आहेत. लडाखसारख्या सामरिकदृष्ट्या अत्यंत संवेदनशील सीमाभागात राहून शत्रू राष्ट्राचा धाक दाखवणे आणि देशांतर्गत तरुणांना चिथावणी देणे, या दोन्ही गोष्टी एकाच वेळी घडत आहेत. यावरून हे आंदोलन केवळ स्थानिक विकासासाठी नसून, देशाला आतून कमकुवत करण्याच्या मोठ्या डावाचा भाग तर नाही ना, अशी गंभीर शंका उपस्थित होते. या आंदोलनाच्या पडद्यामागे पंतप्रधान नरेंद्र मोदी विरोधातील एक मोठी फळी कार्यरत असल्याचे दिसते. देशातील तरुणांमध्ये सतत असंतोष जिवंत ठेवणे आणि सरकारविरुद्ध वातावरण तयार करणे, हा या शक्तींचा जुनाच अजेंडा आहे. कोणत्याही भावनिक आवाहनाला बळी पडण्यापूर्वी, त्यामागील सुप्त राजकीय हेतू, परकीय शक्तींचे छुपे मनसुबे आणि देशाच्या अंतर्गत सुरक्षेला असणारा धोका ओळखणे हीच आजच्या काळातील प्रत्येक सुजाण आणि सजग नागरिकाची पहिली जबाबदारी आहे.

**अविनाश देशपांडे**/पुणे

### जगातील सर्वांत दुर्मिळ संपत्ती

आपल्या आयुष्यातील प्रश्नांची उत्तरे न देता मनाला शांतता देणारी माणसे हीच खरी दुर्मिळ संपत्ती आहे, तिचे जतन करायला शिका. आपण जसे आहोत तसे स्वीकारणारी ती माणसे असतात. सध्या बोलणारे, निष्कर्ष काढणारे, न्याय करणाऱ्यांचाच भरणा वाजवीपेक्षा जास्त होतो आहे. ऐकून घेत नाहीत, ना समजून घेत, ना आपल्याला स्वीकारत. त्यांना जवळ करून उपयोग काय? तेव्हा मात्र भिजलेल्या प्रवाशाला कुठलेही भाष्य न करता त्याला आश्रय देणारे झाड, काहीही अपेक्षा न ठेवता लाटांच्या आवाजाने मनातील गोंधळ शांत करणारा रत्नाकर आणि थकलेले मूल आईच्या कुशीतच शांत का होते, याचा कधीतरी हा नरदेह विचार करणार की नाही? आपल्याला कुणीतरी ऐकावे, समजून घ्यावे असे जर वाटत असेल तर विसावा देणारे मनाचे न्यायालय २४ तास जागृत ठेवावे लागते. विश्वासाचं, निःस्वार्थ मायेचं नातं जपलं की आपला उद्धार करायला परमेश्वरालाही सोपे जाते. कर्तृत्व, शिफारस व अर्ज नसताना सुद्धा हृदय चालविणारा, विना अडथळा संदेशवहन करणारी

प्रणाली चालविणारा, टेस्टर, कॅमेरे, सेन्सर प्रणाली, स्वरप्रणाली, अद्भुत शरीर रचना आणि ज्याची आठवण सतत रहावी अशा आत्म्याचे फिटिंग करणारा अशा आर्किटेकचे रामकृष्ण हरी, श्रीराम जय राम जय जय राम असा नामघोष करून कृतज्ञता व्यक्त करावी, कारण तीच जगातील वेगवेगळ्या रूपातून प्रकट झालेली दुर्मिळ संपत्ती आहे. ■

**अमोल करकरे**/९९६७६२७६१७

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## गोसंरक्षणाचा बुलंद आवाज! : 5 लाख गोभक्तांच्या सह्यांद्वारे केंद्र सरकारकडे मागणी करणार

**बीड (प्रतिनिधी) :** देशभर राबविण्यात येत असलेल्या 'गो सन्मान आवाहन अभियान' अंतर्गत बीड जिल्ह्यात तब्बल ५ लाख गोभक्तांच्या सह्या संकलित करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शनिवार, दि. १८ जुलै २०२६ रोजी बीड शहरात जिल्हास्तरीय नियोजन बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीत जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील गोसेवक, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि गोभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत अभियानाची उद्दिष्टे, जिल्हाभर राबविण्यात येणाऱ्या जनजागृती मोहिमेचे नियोजन, तालुकानिहाय व गावनिहाय जबाबदाऱ्या, तसेच प्रत्येक गाव, शहर आणि वॉर्डपर्यंत अभियान प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी कृती आराखडा निश्चित करण्यात आला. घराघर संपर्क अभियान राबवून प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचत जास्तीत जास्त सह्या संकलित करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. यावेळी मार्गदर्शकांनी सांगितले की, 'गो सन्मान आवाहन अभियान' हे केवळ सही संकलन अभियान नसून, गोमातेच्या संरक्षण, संवर्धन आणि सन्मानासाठी उभारलेले राष्ट्रव्यापी जनआंदोलन आहे. समाजातील प्रत्येक घटकाने या अभियानात सहभागी होऊन गोसंरक्षणाच्या या पवित्र कार्यात आपले योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

या अभियानाच्या माध्यमातून संपूर्ण भारतात गोहत्येवर संपूर्ण बंदी, गोमातेला 'राष्ट्रमाता' अथवा 'राष्ट्र आराध्या' म्हणून राष्ट्रीय सन्मान, तसेच गोसेवेसाठी स्वतंत्र केंद्रीय गोसेवा मंत्रालयाची स्थापना करून प्रभावी केंद्रीय कायदा लागू करावा, या प्रमुख मागण्यांसाठी देशभरातून जनसमर्थन गोळा करण्यात येणार आहे.

## नीट परीक्षेतील यशाबद्दल कु. वैष्णवी हंगे मातृभूमी कडून सन्मानित



**बीड (प्रतिनिधी ) :** वैद्यकीय राष्ट्रीय पात्रता( नीट ) 2026 परीक्षेत 720 पैकी 571 गुण घेऊन उल्लेखनीय यश संपादन करत वैद्यकीय शिक्षणाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे. नीट परीक्षेतील उल्लेखनीय यशाबद्दल मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने दिनांक 18 जुलै 2026 शनिवार रोजी कृष्णानाई नगर येथील मातृभूमी प्रतिष्ठान कार्यालयात तिचा सौ.प्रभा वनवे व सौ. सुलभा तांदळे यांच्या हस्ते शाल,पुष्पगुच्छ, स्टेथोस्कोप व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी वैष्णवीला पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत तिच्या मेहनतीचे कौतुक केले. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा शिक्षण व करिअर कौन्सिलर डॉ. संजय तांदळे, मुख्याध्यापक राम वनवे, सौ. प्रभा वनवे, सौ. सुलभा तांदळे, सृष्टी तांदळे, कु. वैष्णवी हंगे चे पालक कल्याण हंगे, सौ. आशा वनवे आदींची उपस्थिती होती.

## जय भवानी महाविद्यालयात "करिअर कट्टा" अंतर्गत विद्यार्थी संसदेची स्थापना

### विद्यार्थी संसद शपथ ग्रहण सोहळा संपन्न



**पाटोदा (प्रतिनिधी):** दिनांक : १५जुलै:पाटोदा येथिल जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र माहितीतंत्रज्ञान साह्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "करिअर कट्टा " ची स्थापना करून विद्यार्थी संसदेचा शपथ ग्रहण सोहळा उसाहात संपन्न झाला. या प्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे होते.तर प्रमुख उदघाटक म्हणुन श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी चे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर हे होते . प्रारंभी करिअर कट्टा संसदेत नवनियुक्त सर्व पदाधिकाऱ्यांना गोपनियतेची व कर्तव्याची शपथ देण्यात आली. या वेळी आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचा तसेच महाविद्यालयाच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व करिअरविषयक उपक्रमामध्ये सक्रिय सहभाग घेण्याचा संकल्प करण्यात आला. या प्रसंगी उदघाटक प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी सांगितले की विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसीत होण्यासाठी व .आपल्या जबाबदाऱ्या समजण्यासाठी व करिअर मध्ये विकास करण्यासाठी अत्यंत महत्वाचा उपक्रम आहे. त्याचा विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन योग्य लाभ घ्यावा! असे विद्यार्थ्यांना आवाहन केले.शेवटी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांनी सांगितले की विद्यार्थ्यांनी " करिअर कट्टा " या व्यासपीटाचा योग्य उपयोग करून आपल्या भविष्याची दिशा निश्चित करावी असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. या प्रसंगी करिअर कट्टा विभागाच्या समन्वयक तथा विद्यापीठ अधिसभेच्या सदस्या प्रा. डॉ. कल्पना घारगे, प्रा. डॉ. सुनिल जाधव, प्रा. सोमनाथ घाडगे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रा. विनोद किर्दक, नाटककार प्रा. बापू घोक्षे, क्रिडा विभागाचे प्रा. डॉ.प्रविण शिलेदार,प्रा. गोपाळ धांडे, प्रा. डॉ . बंडू लोखंडे,प्रा. डॉ. रामकृष्ण प्रधान, ग्रंथपाल प्रा.श्रीमती ज्योती रकटे आदि प्राध्यापक बांधव उपस्थित होते.

या शपथ ग्रहण सोहळ्याचे दिमागदार संचलन प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी केले. व आभार प्रा. डॉ. शिवाजी काकडे यांनी मानले.या प्रसंगी बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

### करिअर कट्टा उपक्रमाचा उद्देश

**करिअर कट्टा हा महाराष्ट्र शासनाचा महत्वकांक्षी उपक्रम असुन. ग्रामिण भागातील विद्यार्थ्यामध्ये नेतृत्व गुण, उद्योजकता, स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी,आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरणार आहे. पाटोदा येथिल जय भवानी महाविद्यालयातील करिअर संसदेच्या स्थापनेमुळे ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना विविध उपक्रमाद्वारे स्वतःच्या कौशल्याचा विकास करण्याची एक नवी संधी निर्माण होणार आहे.**

## पंकजाताई मुंडेंचा सर्वसमावेशक बीड जिल्हा दौरा ; प्रत्येक घटकाला भेटल्या, जाणून घेतल्या व्यथा

### जनता दरबार ठरला सर्वसामान्यांसाठी उपयुक्त

**परळी वैजनाथ दि. १९ :** राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचा नुकताच पार पडलेला बीड जिल्हा दौरा हा केवळ शासकीय कार्यक्रमांपुरता मर्यादित न राहता जनतेच्या सुख-दु:खाशी नाळ जोडणारा आणि सर्वसामान्यांच्या अपेक्षांना प्रतिसाद देणारा ठरला. सर्वसमावेशक घटकांच्या प्रश्नांची सोडवणूक , विकासकामांचा आढावा, शासकीय बैठका, विविध उद्घाटने आणि नागरिकांच्या प्रत्यक्ष भेटीगाठी यांमुळे हा दौरा जिल्हाभर चर्चेचा विषय ठरला.

या दौऱ्यादरम्यान पंकजाताईंनी गेवराई, बीड, परळी, अंबाजोगाई, केज, माजलगाव आदी भागांना भेट देत विकासकामांचा वेग वाढविण्यावर भर दिला. विविध शासकीय विभागांच्या बैठका घेऊन प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्याबाबत अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या. विशेष म्हणजे, प्रत्येक ठिकाणी त्यांनी कार्यकर्ते, शेतकरी, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक, उद्योजक आणि विविध समाजघटकांशी थेट संवाद साधला. नागरिकांनी मांडलेल्या समस्या ऐकून त्यांच्या



निराकरणासाठी जागेवरच निपटारा केला. त्याचप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याने अनेकांना दिलासा मिळाला.पंकजाताई मुंडे यांच्या दौऱ्यात औपचारिकतेपेक्षा जनसंपर्काला अधिक महत्त्व दिल्याचे चित्र पाहायला मिळाले. दिवसभराच्या व्यस्त कार्यक्रमानंतरही त्यांनी कार्यकर्ते आणि नागरिकांसाठी स्वतंत्र वेळ राखून ठेवत प्रत्येकाशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या भेटीसाठी आलेल्या नागरिकांमध्ये समाधानाची भावना दिसून आली.

या दौऱ्यात विविध विकासकामांचे उद्घाटन, शासकीय योजनांचा आढावा आणि स्थानिक प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्याची भूमिका यामुळे विकासाभिमुख नेतृत्वाची छाप अधिक ठळक झाली. सर्व समाजघटकांशी साधलेला थेट संवाद, लोकांच्या अडचणी समजून घेण्याची संवेदनशीलता आणि विकासाच्या कामांना दिलेली गती यामुळे पंकजाताई मुंडे यांचा हा बीड जिल्हा दौरा जनतेच्या अपेक्षांना न्याय देणारा आणि लोकाभिमुख नेतृत्वाचा प्रभावी नमुना ठरल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

ना. पंकजाताई कुठेही असोत जनतेला भेटल्याशिवाय एकही दिवस जात नाही. दौऱ्यात परळी व अंबाजोगाईत झालेला जनता दरबार जिल्ह्यात चर्चेचा ठरला. या जनता दरबारात सकाळपासूनच नागरिकांनी गर्दी केली होती. रस्ते, पाणीपुरवठा, वीज वितरण, महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणे आणि वैयक्तिक लाभाच्या योजना अशा विविध समस्या घेऊन नागरिक आले होते.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ₹48 हजार कोटींच्या कृषी वीजबिल दिलासा निर्णयाचे स्वागत : शंकर देशमुख

**बीड, प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांनी शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत राज्यातील शेतकरी बांधवांसाठी सुमारे ₹४८ हजार कोटींच्या थकीत कृषी वीजबिलांना दिलासा देण्याचा ऐतिहासिक निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असून, भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी या निर्णयाचे मन:पूर्वक स्वागत केले आहे.

प्रसिद्धीपत्रकात देशमुख म्हणाले की, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेअंतर्गत ७.५ एचपीपर्यंतच्या कृषी पंपधारक शेतकऱ्यांच्या थकीत वीजबिलांबाबत सुमारे ₹४८ हजार कोटींचा दिलासा देण्याचा निर्णय हा राज्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार



आहे. यामुळे लाखो शेतकरी कुटुंबांवरील आर्थिक भार कमी होईल आणि शेतीला नवी ऊर्जा मिळेल.

देशमुख पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या कारकिर्दीत शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना नेहमीच प्राधान्य दिले आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून त्यावर ठोस निर्णय घेण्याची त्यांची कार्यपद्धती राज्यातील कृषी क्षेत्रासाठी दिलासादायक ठरली आहे.

₹४८ हजार कोटींच्या कृषी वीजबिल दिलासा निर्णयामुळे राज्यातील सुमारे ४६ लाख शेतकरी कुटुंबांना थेट लाभ होणार असून, हा निर्णय ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारा आणि शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढविणारा आहे, असेही शंकर देशमुख यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने शेतकरी कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य दिले असून, हा निर्णय त्याच धोरणाचा महत्त्वपूर्ण भाग असल्याचे देशमुख यांनी सांगितले. या ऐतिहासिक निर्णयाबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करून राज्यातील सर्व शेतकरी बांधवांच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त केले.

## परळी मतदारसंघातील (SIR) कामाचा धनंजय मुंडे सोमवारी घेणार आढावा



परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी) - परळी वैद्यनाथ विधानसभा मतदारसंघासह राज्यात सर्वत्र मतदार विशेष संक्षिप्त पुनरीक्षण SIR अभियान सुरू असून परळी विधानसभा मतदारसंघात सुरू असलेल्या कामाचा माजी मंत्री आ. धनंजय मुंडे हे सविस्तर आढावा घेणार आहेत. ही आढावा बैठक शहरातील विशेष अतिथी विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आली असून, सकाळी १० ते १ परळी वैद्यनाथ शहर तर २ ते ५ दरम्यान ग्रामीण मतदारसंघाचा आढावा घेऊन श्री मुंडे योग्य सूचना करतील. या बैठकीसाठी सर्व संबंधित अधिकारी, BLO तसेच BLA यांसह सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी अद्ययावत माहितीसह उपस्थित राहण्याचे आवाहन धनंजय मुंडे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## आरोपी नगरसेवक रमेश म्हात्रेचा अंतरीम जामीन रद्द : डॉ.राजेश इंगोले



**अंबाजोगाई :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सरकारी रूग्णालयात एका महिला डॉक्टरसह दोन डॉक्टरांना व पारिचारकांना रमेश म्हात्रे नामक शिंदे सेनेच्या नगरसेवकाने मारहाण केल्यामुळे महाराष्ट्रातील सर्व डॉक्टरच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला. डॉक्टरांची संघटना असणाऱ्या इंडियन मेडिकल असोसिएशनने याविरूद्ध दंड थोपटत मारकुट्या नगरसेवक रमेश म्हात्रे सह इतर चार जणांवर कडक कायदेशीर कार्यवाही करावी याकरीता तीव्र निषेध व्यक्त करीत राज्यव्यापी आंदोलनाला सुरूवात केली होती. यातच दंडाधिकारी यांनी आरोपी नगरसेवक रमेश म्हात्रे यांच्या प्रकृती अस्वास्थ्याचे कारण समोर देत अनेक त्रुटी पूर्ण कार्यवाही करीत जामीन दिला होता. या जामीनामुळे महाराष्ट्रात सर्वत्र डॉक्टरांमध्ये तीव्र असंतोष पसरला व इंडियन मेडिकल असोसिएशनने आयुर्वेद असोसिएशन डेंटल असोसिएशन होमिओपॅथी असोसिएशन नर्सिंग असोसिएशन यांच्या साह्याने महाराष्ट्रात उद्या सोमवारी २० जुलै २०२६ रोजी लाक्षणिक स्वरूपाचा बंद पुकारला होता. डॉक्टरांच्या या तीव्र भावनांचा उद्रेक व तीव्रता लक्षात घेता माननीय न्यायालयाने स्वतःच आरोपी नगरसेवक रमेश म्हात्रे विरूद्ध सुमोटो याचिका दाखल करून दंडाधिकाऱ्यांच्या त्रुटींपूर्ण जामिनावर बोट ठेवत सदरील जामीन नामंजूर करीत त्याला पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश प्रशासनाला दिले. रमेश म्हात्रे पोलिसांना शरण न आल्यास त्याच्या मालमत्ता जप्तीचे ही आदेश न्यायालयाने दिले आहेत.

देशाच्या इतिहासात प्रथमच डॉक्टरांच्या सुरक्षेबाबत माननीय न्यायालयाने गंभीर दखल घेत स्वतःहून ही सुमोटो याचिका दाखल करीत न्यायालय डॉक्टरांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत न्यायालय डॉक्टरांच्या मागे खंबीरपणे उभे आहे हे या याचीकेतून स्पष्ट केले. ही सुमोटो याचिका दाखल करत असताना माननीय न्यायालयाने इंडियन मेडिकल असोसिएशनच्या राज्य पदाधिकाऱ्यांना सोमवारी होणारा संप करू नये व रूग्णांच्या आरोग्याला प्राधान्य द्यावे अशी विनंती केली. न्यायालयाच्या या विनंतीचा मान राखत इंडियन मेडिकल असोसिएशनने उद्या सोमवारी होणारा एक दिवसाचा लाक्षणिक संप पुढे ढकलला आहे. मात्र डॉक्टरांच्या सुरक्षितते विषयी सरकारने धोरणात्मक नियम तयार करून सध्या अस्तित्वात असलेला मेडिकेअर कायदा आणखीन कडकपणे राबवून डॉक्टरांना निर्भय वातावरण द्यावे अन्यथा यानंतर बेमुदत खासगी व सरकारी दवाखाने बंद असे आंदोलन राबविण्यात येईल असा इशारा संघटनेने दिला आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनने माननीय न्यायालयाचे आभार व अभिनंदन करीत डॉक्टरांच्या सुरक्षितते विषयी प्रचलित अस्तित्वात असणारा मेडिकेअर कायद्याची अंमलबजावणी कठोरपणे करावी याविषयी सरकारला प्रशासनाला कडक निर्देश द्यावे अशी विनंती केली आहे.

## मोठेवाडीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा बूथ संपर्क दौरा उत्साहात

### कार्यकर्त्यांच्या बैठकीला मोहन जगताप यांची प्रमुख उपस्थिती; शिवसेनेत गेलेल्या कार्यकर्त्यांची घरवापसी

**माजलगाव, दि. १९ (प्रतिनिधी):** माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने रविवारी बूथ संपर्क दौरा व कार्यकर्त्यांची बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीस पक्षाचे नेते मोहन जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत बूथस्तरावरील संघटन अधिक सक्षम करणे, प्रत्येक मतदारापर्यंत पक्षाची भूमिका पोहोचविणे, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटन विस्तार, नव्या



कार्यकर्त्यांचा सहभाग, मतदारांशी सातत्याने संपर्क आणि बूथनिहाय नियोजन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी नुकतेच शिवसेना (शिंदे गट) मध्ये प्रवेश केलेले शिवकुमार माने सरपंच, सुरुमगाव आणि अंगद खेत्री उपसरपंच, मोठेवाडी यांनी घरवापसी करत पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) मध्ये जाहीर प्रवेश केला. मोहन जगताप यांच्या हस्ते त्यांचे स्वागत करण्यात आले. त्यांच्या पुनर्प्रवेशामुळे परिसरातील पक्ष संघटनेला निश्चितच बळ मिळेल, अशी भावना उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

यावेळी बूथ लेव्हल एजंट (BLA) म्हणून पांडुरंग गोंडे, प्रभाकर खेत्री आणि दत्तात्रय चव्हाण यांची निवड करण्यात आली. मोहन जगताप यांच्या हस्ते तिघांनाही नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. बूथस्तरावरील संघटना अधिक सक्षम करून पक्षाची विचारधारा प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यासाठी जोमाने काम करण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

## प्राचार्य तेजेस तिडके यांचे शैक्षणिक व साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान : ॲड.दत्तात्रय महाराज आंधळे

**तेलगाव (प्रतिनिधी) :** बाल्यावस्था व वृद्धिअवस्था तसेच शालेय विषयांचे अध्यापन शास्त्र प्राचार्य तेजस तिडके लिखित या दोन पुस्तकांचे प्रकाशन संतवाङ्मयाचे संशोधक ह.भ.प.ॲड.दत्तात्रय महाराज आंधळे आणि योगेश्वरी शिक्षण संस्था भोगलवाडीचे सचिव ह.भ.प.ॲड. पांडुरंग महाराज तिडके यांच्या शुभ हस्ते संपन्न झाले.

दिनांक 18जुलै 2026रोजी अध्यापक विद्यालय कारी येथे या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन केले होते.यावेळीअरबी दुबे प्रा सतीश पांचाळ प्रा.उमेश तिडके प्रा. सीमा सौंदरमल मॅडम श्री अशपाक मोमीन व बाबासाहेब वावळकर व सर्व महाविद्यालय



स्टाफ उपस्थित होता.

डॉ. तेजस आश्रुबा तिडके हे उच्च शिक्षण क्षेत्रातील अनुभवी शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि प्राध्यापक असून त्यांना १५ वर्षांहून अधिक अध्यापनाचा अनुभव आहे. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगर येथून २००९ मध्ये शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली. त्यांचा संशोधन विषय "मराठवाड्यातील ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शैक्षणिक समस्या" हा होता. तसेच त्यांनी २०१३ मध्ये शिक्षणशास्त्र विषयातील राज्य पात्रता परीक्षा (SET) उत्तीर्ण केली.

त्यांनी एम.एड., एम.ए. (मराठी), एम.ए. (समाजशास्त्र), डी.एस.एम. तसेच कन्स्ट्रक्शन सुपरवायझर या पात्रता प्राप्त केल्या आहेत. सध्या ते सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असून यापूर्वी त्यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अभ्यासकेंद्र प्रमुख, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे माहिती केंद्र संचालक तसेच संशोधन मार्गदर्शक आणि पदव्युत्तर (PG) शिक्षक म्हणूनही जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत.

## बैद्यनाथ संस्थापक पं. रामनारायणजी शर्मा वैद्य यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ संस्कृत विद्वानांचा सन्मान

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ (केकेएसयू), रामटेक यांच्या वतीने संस्कृत क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या नऊ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विद्वानांचा सन 2023, 2024 आणि 2025 साठी ष्महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात आला. हा पुरस्कार सोहळा बैद्यनाथ समूहाचे संस्थापक वैद्य पंडित रामनारायणजी शर्मा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रामनारायण शर्मा आयुर्वेद रिसर्च फाउंडेशन, स्थानिक जिल्हा प्रशासन आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी), नागपूर यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तसेच केकेएसयूचे संस्थापक कुलगुरू डॉ. पंकज चांदे यांनी संस्कृत विद्यापीठांनी परदेशी



विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यमातून अध्यापन सुरू करण्याचे आवाहन केले, जेणेकरून संस्कृतचा जागतिक स्तरावरील प्रसार अधिक प्रभावी होईल. त्यांनी सांगितले की तत्कालीन जिल्हाधिकारी मनुकुमार श्रीवास्तव तसेच बैद्यनाथचे डायरेक्टर सुरेशजी शर्मा यांच्या सहकार्य व आर्थिक सहाय्याने कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाने महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्काराची सुरूवात केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अतुल वैद्य होते. त्यांनी संस्कृत विद्वानांना भारताची बौद्धिक संपत्ती संबोधत विद्यापीठाला जागतिक स्तरावर प्रतिष्ठित संस्था बनविण्याची वचनबद्धता व्यक्त केली. प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित आयसीटी, मुंबईचे माजी कुलगुरू प्रो. गणपती यादव यांनी कालिदास दिनानिमित्त अशा विद्वानांच्या समूहाशी भेट होणे ही अत्यंत आनंदाची बाब असल्याचे सांगितले.

बैद्यनाथचे डायरेक्टर सुरेशजी शर्मा तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे वरिष्ठ प्रादेशिक व्यवस्थापक दिनेश पाटील हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. व्यासपीठावर संस्कृत व इतर भाषा विद्याशाखेच्या अधिष्ठाता प्रो. कविता होले, रामटेक परिसराचे संचालक प्रो. हरेकृष्ण अगस्ती, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. रोशन अलोने तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. स्वागत व प्रास्ताविक प्रो. कविता होले यांनी केले. यावेळी पुरस्कार सोहळ्याचा सचित्र इतिहास दर्शविणाऱ्या ष्कालिदसीयमध् या स्मरणिकेचे तसेच विद्यापीठाच्या ष्वैदर्भीष् या वृत्तपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले.

पुरस्कार आंतरराष्ट्रीय संस्कृत विद्वान, ज्येष्ठ संस्कृत विद्वान आणि युवा संस्कृत विद्वान अशा तीन गटांमध्ये प्रदान करण्यात आले. पुरस्कारांच्या प्रशस्तिपत्रांचे वाचन समारंभ समन्वयक डॉ. रेणुका बोकारे, प्रो. राधा देशकर, अथर्व भारद्वाज आणि डॉ. सिमरन ठाकूर यांनी केले. आंतरराष्ट्रीय संस्कृत विद्वान गटात प्रो. चंद्रकिरण सलूजा, प्रो. सरोजा भाटे (पुणे) आणि प्रो. माधव देशपांडे (मिशिगन विद्यापीठाचे माजी प्राध्यापक) यांना महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

ज्येष्ठ संस्कृत विद्वान गटात नंदकिशोर पट्टरकिने, प्रो. कालुरी हनुमंथा राव आणि प्रो. कृष्णकांत शर्मा यांचा सन्मान करण्यात आला.

तर युवा संस्कृत विद्वान गटात डॉ. रामकृष्ण पेजट्टाया, प्रो. वीरनारायण पांडुरंग आणि डॉ. सचिन कठाले यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

आंतरराष्ट्रीय व ज्येष्ठ संस्कृत विद्वान गटातील पुरस्कार विजेत्यांना 50,0008- ची रोख रक्कम, प्रशस्तिपत्र, शाल आणि श्रीफळ प्रदान करण्यात आले. युवा संस्कृत विद्वान गटातील पुरस्कार विजेत्यांना 25,0008- ची रोख रक्कम, प्रशस्तिपत्र, शाल आणि श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुमित कठाले यांनी केले, तर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. रोशन अलोने यांनी आभार प्रदर्शन केले

# हिंगोलीत इस्कॉनच्या श्री जगन्नाथ रथयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## रथयात्रेत मोठ्या संख्येने महिला, पुरूष, युवकांचा सहभाग







**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जुलै**

प्रति वर्षाप्रमाणे यंदाही हिंगोली येथील इस्कॉन शाखेच्या वतीने श्री जगन्नाथ रथयात्रा महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले. यावेळी श्री जगन्नाथाचा रथाची उत्कृष्ट सजावट करण्यात आली होती. श्रीकृष्णाच्या नामसंकिर्तनात महिला, पुरूष, युवकांनी ठेका धरीत रथयात्रेत सहभाग नोंदविला.

शहरातील मुख्य मार्गावरून श्री जगन्नाथ रथाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. मुंबई येथील इस्कॉन चौपाटीच्या श्री श्री राधा गोपीनाथ मंदिराचे वरिष्ठ कथाव्यास श्रीमान रुद्रनाथ प्रभूजी यांचे विशेष प्रवचन आयोजित करण्यात आले. तसेच श्रीमान अभय गोपाल प्रभूजी इस्कॉन चौपाटी यांच्या मधुर वाणीत हरिनाम संकीर्तनाचा पार पडला.

श्री जगन्नाथ रथयात्रेला अंबिका टाकीजवळील श्री संकटमोचन हनुमान मंदिर येथून हरे कृष्णच्या जयघोषात प्रारंभ होणार आहे. त्यानंतर रथयात्रा गांधी चौक, इंदिरा गांधी चौक व जवाहर रोड मार्गे श्री बद्रीनारायण मंदिर येथे पोहोचला. तेथे हरिनाम संकीर्तन, सांस्कृतिक नृत्य श्री जगन्नाथजीची कथा, तसेच महाप्रसाद वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावर्षीच्या रथयात्रेत नागपूर येथील उद्योगपती धन-राज खंडेलवाल, मुंबई येथील सहाय्यक धर्मादाय आयुक्त रविंद्र धायतडक, डॉ विजय निलावार यांच्यासह हिंगोली, परभणी, वाशीम तसेच स्थानिक इस्कॉन परिवारातील अनेक साधक सहभागी झाले होते. अतिशय भक्तिमय वातावरणात श्री जगन्नाथ यांची रथयात्रा निघाली होती.

# बहुविध प्रशालेत जागतिक युवा कौशल्य दिन साजरा

## व्यावसायिक शिक्षणाच्या लॅबचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जुलै**

जिल्हा परिषद बहुविध प्रशाला येथे व्यावसायिक शिक्षण अंतर्गत जागतिक युवा कौशल्य दिन साजरा करण्यात आला. कौशल्य दिनानिमित्त प्रशाले मध्ये व्यावसायिक शिक्षणाच्या लॅबचे उद्घाटन करण्यात आले या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सोनवणे व्हि डी. उद्घाटक उपशिक्षणाधिकारी साखरकर यांची तर प्रमुख पाहुणे गटशिक्षणाधिकारी सचिन वाघ, उर्दू विभाग प्रमुख अनिस शहा, खिल्लारी, श्रीमती अफरोज, इटकरे, व्यावसायिक शिक्षक मगर ए.व्हि., दीपक पवार, जहीर शेख उपस्थित होते.

प्रशालेमध्ये मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी मल्टी स्किल आणि ऑटोमोबाईल हे दोन विशेष शिकवले जातात. व उर्दू माध्यमांच्या विद्यार्थ्यांसाठी इलेक्ट्रॉनिक अँड हार्डवेअर हे विशेष शिकवले जातात या अंतर्गत जागतिक युवा कौशल्य दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यवसाय शिक्षक आशिष मगर यांनी केले. विद्यार्थ्यांना उपशिक्षणाधिकारी श्री.साखरकर साहेबांनी जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या स्किल व त्याचे महत्त्व सांगितले.

व कार्यक्रमाची सांगता मुख्याध्यापिका सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना प्रशालेत सुरू असलेल्या व्यावसायिक शिक्षणाचे कसे फायदे घ्यायचे व पुढील जीवनामध्ये त्याचा उपयोग कसा करायचा याविषयी माहिती सांगितली. त्यानंतर व्यावसायिक लॅब चे उद्घाटन करण्यात आले. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या साहित्याचे प्रदर्शन केले. प्रोजेक्ट विषयी माहिती सांगितली. उपशिक्षणाधिकारी साखरकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व त्यांना पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र इंजिनिअर्स असोसिएशनची जिल्हा कार्यकारणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जुलै**

महाराष्ट्र इंजिनिअर्स असोसिएशनच्या केंद्रीय समितीच्या मार्गदर्शनाखाली आणि राज्याध्यक्ष इंजी. प्रदीप पडोळे, राज्य महासचिव इंजी. एम. ए. हकीम, तसेच हिंगोलीचे माजी जिल्हाध्यक्ष इंजी. गुलाम कुरेशी व इंजी. विठ्ठल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२६-२७ या वर्षासाठी हिंगोली जिल्ह्याची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय, खासगी क्षेत्रातील तसेच सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना संघटनेच्या माध्यमातून एकत्र आणणे, त्यांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचविणे आणि अभियंत्यांच्या हितासाठी सकारात्मक पद्धतीने कार्य करणे, हा या कार्यकारिणीचा प्रमुख उद्देश असल्याचे संघटनेच्या नेतृत्वाने सांगितले.

नवीन जिल्हा कार्यकारिणीमध्ये जिल्हाध्यक्ष इंजी. अमितकुमार बालकृष्ण काबरा (वसमत), उपाध्यक्ष इंजी. दिनेश जाधव, जिल्हा सचिव इंजी. भूषण देवेंद्र जैस्वाल, कोषाध्यक्ष इंजी. शेख मोइन शेख गुलाम, जिल्हा समन्वयक इंजी. गुलाम कुरेशी (औंढा बालापूर), इंजी. विठ्ठल शिंदे (सेनगाव)ख इंजी. जयप्रकाश फेगडे (वसमत), इंजी. नचिकेत शिंदे (कळमनुरी), यावेळी इंजी. नेहाल शेख, इंजी. योगेश घुगे, इंजी. अनिल शेळके, इंजी. धनराज गोरे, इंजी. योगेश कुरवाडे, इंजी. अमित अवसरमल, इंजी. संकेत इंगोले, इंजी. प्रवीण कांबळे, इंजी. सय्यद अशनफ, इंजी. सय्यद अशरफ अली यांच्यासह जिल्ह्यातील अनेक अभियंते व सुशिक्षित बेरोजगार अभियंते उपस्थित होते.

नवनियुक्त जिल्हाध्यक्ष इंजी. अमितकुमार काबरा यांनी पदभार स्वीकारल्यानंतर सांगितले की, जिल्ह्यातील अभियंत्यांच्या विविध समस्या आणि प्रलंबित मागण्या संबंधित विभाग व शासनाच्या निदर्शनास आणून त्या मार्गी लावण्यासाठी संघटना सातत्याने प्रयत्न करेल. तसेच सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना उपलब्ध संधींबाबत मार्गदर्शन करणे, त्यांना न्याय्य संधी मिळवून देण्यासाठी सकारात्मक पाठपुरावा करणे आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जिल्ह्याच्या विकासात अभियंत्यांचे योगदान वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतील.



**हिंगोली– दि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी रविवारी सभासदांनी मतदान केले. या निवडणुकीत आ. तान्हाजीराव मुटकुळे, उमेदवार सौ राजामती मुटकुळे यांनी मतदानाचा हक्क बजावला. या निवडणुकीत ८ संचालकांसाठी निवडणुका पार पडल्या आहेत. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### आज महिला लोकशाही दिनाचे आयोजन

हिंगोली– जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी किंवा तिसऱ्या सोमवारी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतर येणाऱ्या कामकाजाच्या दिवशी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन राबविण्यात येतो. माहे जुलै, २०२६ च्या महिला लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, (दि. २० जुलै) रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, कक्ष क्र. एस-७, हिंगोली यांच्या कार्यालयात सादर करावेत. यामध्ये न्याय प्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यकती कागदपत्रे न जोडलेले, सेवा, आस्थापनाविषयक बाबी, तक्रार निवेदन वैयक्तिक स्वरुपाची नसेल असे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या व्यासपीठाचा उपयोग आपल्या अडचणी सोडविण्यासाठी करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.

### त्रैमासिक विवरणपत्र ३१ जुलैपर्यंत सादर करा

हिंगोली– जिल्ह्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी आस्थापनांवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती असलेले माहे जून २०२६ अखेरचे ईआर-१ त्रैमासिक विवरणपत्र ३१ जुलै २०२६ पर्यंत संकेतस्थळावर ऑनलाईन भरणे बंधनकारक असल्याचे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, हिंगोली यांनी कळविले आहे. हे विवरणपत्र भरल्याचे ऑनलाईन प्रमाणपत्र माहे जुलै २०२६ च्या वेतन देयकासोबत जोडणे आवश्यक असून, हे प्रमाणपत्र जोडल्याशिवाय वेतन देयके व इतर कोणतेही देयके स्वीकारली जाणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांना या कार्यालयामार्फत युजर आयडी व पासवर्ड यापूर्वीच वितरित करण्यात आलेले आहेत. सर्व कार्यालयांनी आपले ईमेल आयडी, दूरध्वनी क्रमांक, पत्ता, टॅन नंबर व पॅन नंबर नोंदवून आपली प्रोफाईल अद्ययावत करावी, असेही प्रसिद्धीपत्रकाद्वारे सूचित करण्यात आले आहे.

### माळसेलू येथील उड्डाणपूलाखाली चिखल



हिंगोली– सध्या पाऊस सुरू असून तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावर बांधलेल्या माळसेलू येथील उड्डाणपुलाखाली पाण्यासोबत मोठ्या प्रमाणावर माती वाहून आली असून चिखल साचला आहे. त्यामुळे पुलाखालून जाणे धोकादायक बनले आहे. वाहन धारकांना चिखलातून वाहन चालविणे जीवावर बेतण्याची शक्यता आहे. संबंधित विभागाने याकडे लक्ष द्यावे अशी मागणी होत ग्रामस्थ करीत आहेत.

# योगामुळे चारित्र्यनिर्माणासह निरोगी जीवन शक्य- राज्य प्रभारी दिनेश राठोड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जुलै**

योग हा केवळ व्यायाम नसून वैयक्तिक चारित्र्यापासून राष्ट्रीय चारित्र्यनिर्माणापर्यंत समाज घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे. योगामुळे सकारात्मक ऊर्जा, सुदृढ आरोग्य आणि निरामय जीवन प्राप्त होते. त्यामुळे प्रत्येकाने नियमित योगाभ्यास करावा, असे प्रतिपादन पतंजली भारत स्वाभिमानचे राज्य प्रभारी दिनेश राठोड यांनी केले.

हिंगोली येथील विद्यानगर परिसरातील हनुमान मंदिरात पतंजली योग समितीची जिल्हास्तरीय बैठक राज्य प्रभारी दिनेश राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यावेळी भारत स्वाभिमानचे राज्य सहप्रभारी कुंडलिकराव निर्मले, जिल्हा प्रभारी विठ्ठल सोळंके यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीत योग प्रचार-प्रसारासाठी योगशिबिरे आयोजित करणे, गुरुपौर्णिमेनिमित्त उत्सव व दानसंकलन, आजीव सभासद नोंदणी, आचार्य बालकृष्ण यांच्या जयंतीनिमित्त जडीबुटी दिन साजरा करून वृक्षारोपण, योग शिक्षकांना प्रमाणपत्र वितरण, जिल्हा व तालुका समित्यांची पुनर्रचना तसेच योगग्राम, हरिद्वार येथे जाणाऱ्या इच्छुकांची नोंदणी आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी वैद्यकीय पूर्व प्रवेश परीक्षेत यश संपादन केलेल्या योग परिवारातील अनुष्का विठ्ठल सोळंके व यश लक्ष्मण सताळकर या विद्यार्थ्यांचा राज्य प्रभारी दिनेश राठोड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यानंतर वसमत येथे झालेल्या बैठकीतही दिनेश राठोड यांनी योग चळवळीच्या बळकटीकरणासाठी मार्गदर्शन केले. या बैठकीस पतंजलीचे जिल्हा प्रभारी मनमथ गुमटे, किसान सेवा जिल्हा प्रभारी ज्ञानदेव गुट्टे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीचे सूत्रसंचालन रमेश काळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन जिल्हा कोषाध्यक्ष उमेश तोष्णीवाल यांनी मानले. हिंगोली व वसमत येथील बैठका यशस्वी करण्यासाठी बालासाहेब हरण, अशोक पवार, राजेश दारव्हेकर, प्रणत अग्रवाल, बालाजी पाल-वे, सुधाकर माळकर, संजय नाईक, जगन सरकटे, बालाजी जाधव, जनक कदम, वसंत जाधव, गोपाल जवळेकर आदींनी परिश्रम घेतले.

# जवळाबाजार येथे बीएलओंचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जुलै**

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष मतदार यादी पुनरावलोकन मोहिमेत १००% काम पूर्ण करणाऱ्या औंढा नागनाथ तालुक्यातील जवळा बाजार येथील तीन बीएलओ यांचा औंढा नागनाथ तहसीलदार हरीश गाडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

आपल्या केंद्रामध्ये गणना प्रपत्र १०० टक्के वितरित करून त्याचे डिजिटायझेशन केलेल्या बीएलओ अनिल चकोर(तपोवन), सुबोध मुळे (जवळा बाजार), अशोक गि-हे (कोंडसी बुद्रुक) शंभर टक्के काम पूर्ण केलेल्या य तीन बीएलओ यांचा तहसीलदार हरीश गाडे यांनी सन्मान केला. यावेळी निवडणूक नायब तह-सीलदार प्रभाकर काळे, प्रवीण ऋषी, मनोज कांबळे, नितीश कुळकर्णी, सचिन क्षीरसागर, विजय कदम, विनोद साळवे, विनोद घोडके, कैलास जाधव यांच्यासह बीएलओ उपस्थित होते.

# हिंगोली येथे २६ जुलैला एकदिवशीय भव्य राज्यस्तरीय नृत्य स्पर्धा,

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जुलै**

शहरातील नटराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने नृत्य कलेला चालना, नृत्य प्रेमी कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी व जिल्ह्यातील सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी दिं.२६ जुलै रोज रविवारी शहरातील माजी खासदार लोकनेते स्व.शिवाजीराव देशमुख सभागृह येथे दुपारी २ ते रात्री ९:३० पर्यंत डान्स स्पर्धा होणार असून स्पर्धा संपल्यानंतर लगेचच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ होणार आहे.

या स्पर्धेतील विजेत्यांना सामुहिक नृत्य (ग्रुप डान्स) प्रथम पारितोषिक १५,०० रु. स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक ७००० रु. स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय पारितोषिक ५००० रु. स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र या स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी १५०० रु. प्रवेश फी आकारली आहे. वैयक्तिक नृत्य (सोलो डान्स) प्रौढ गट प्रथम पारितोषिक ७००० रु. स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक ५००० रु. स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय पारितोषिक ३००० रु. स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र या स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी ७०० रु. प्रवेश फी आकारली आहे.

वैयक्तिक नृत्य (सोलो डान्स) बाल गट वय ०५ ते १४ वर्षे प्रथम पारितोषिक ५००० रु. स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक ३००० रु. स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय पारितोषिक १५०० रु. स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र या स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी ५००/-रु. प्रवेश फी आकारली आहे. बाल गट यांची स्पर्धा दुपारी २ वाजल्यापासून घेण्यात येणार आहे. स्पर्धकांनी सहभाग घेण्याकरिता आयोजक मिलिंद उबाळे- ९८५०४३३६१९, हारुण पठाण- ९०११९६०१२८ यांच्याशी संपर्क साधावा. नृत्य स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या प्रत्येक स्पर्धकास प्रमाणपत्र देण्यात येईल. ही डान्स स्पर्धा यशस्वी करण्यासाठी नटराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे मिलिंद उबाळे, हारुण पठाण, विशाल इंगोले, निरज देशमुख, सुमित चौधरी, विशाल गोटरे व अॅड.हर्ष बनसोडे हे परिश्रम घेत आहेत.

# हिंगोलीत जिल्हास्तरीय सुब्रतो कप फुटबॉल स्पर्धाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जुलै**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने सन २०२६-२७ या वर्षासाठी जिल्हास्तरीय सुब्रतो कप फुटबॉल क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा १५ वर्षांखालील मुले व १७ वर्षांखालील मुली तसेच १७ वर्षांखालील मुलांच्या गटासाठी होणार असून, जिल्ह्यातील सर्व पात्र शाळांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर यांनी केले आहे.

१५ वर्षांखालील मुले व १७ वर्षांखालील मुलींच्या गटातील स्पर्धा दि. २३ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता तालुका क्रीडा संकुल, पोलीस स्टेशनसमोर, वसमत येथे होणार आहेत. तर १७ वर्षांखालील मुलांच्या गटातील स्पर्धा दि. २४ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता तालुका क्रीडा संकुल, वसमत येथे आयोजित करण्यात आल्या आहेत.

स्पर्धेसाठी १५ वर्षांखालील गटातील खेळाडूंचा जन्म १ जानेवारी २०१२ किंवा त्यानंतरचा, तर १७ वर्षांखालील गटातील खेळाडूंचा जन्म १ जानेवारी २०१० किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे.

स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शाळांनी आपल्या संघाची प्रवेशिका स्पर्धेपूर्वी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात सादर करावी. तसेच स्पर्धेच्या दिवशी खेळाडूंनी व संघ व्यवस्थापकांनी फोटोयुक्त ओळखपत्र सोबत आणणे बंधनकारक राहणार आहे. अधिक माहितीसाठी सचिव, हिंगोली जिल्हा सॉकर असोसिएशन अजहर पटेल (मो. ९१७५७६७७७८) तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, हिंगोली (मो. ९५६१७६०८७८) यांच्याशी संपर्क साधावा, असे प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# दर्जेदार शिक्षणासाठी नांदेड उत्तर मध्ये डिजीटल शाळा बनविणार : आ. बालाजीराव कल्याणकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ जुलै -**

इंग्रजी शाळेची फिस परवडत नाही पण मुलांना दर्जेदार शिक्षण मिळायला हवे या हेतूने नांदेड उत्तर मतदार संघातील अनेक शाळा डिजीटल करणार आहे, इंग्रजी माध्यमांच्या शाळाही चांगल्या बनविणार आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेवून डॉक्टर, इंजिनिअर व इतर उच्च पदस्थ अधिकारी बनावे असे प्रतिपादन नांदेड उत्तर विधानसभा मतदार संघाचे आ. बालाजीराव कल्याणकर यांनी केले.



संध्याताई फाऊंडेशन महाराष्ट्रच्या वतीने जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित रंग भरण स्पर्धा बक्षिस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात नियोजन भवन येथे दि. १९ जुलै रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी आ.बालाजीराव कल्याणकर बोलत होते. या कार्यक्रमाला आ. बालाजीराव कल्याणकर, आ. श्रीजयाताई चव्हाण, महापौर सौ. कविता मुळे, आयोजक सौ. संध्याताई कल्याणकर, अप्पर पोलिस अधिक्षक सुरज गुरव, जि.प. च्या प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाने, मनपाच्या शिक्षणाधिकारी प्रविणा मांदळे, नगरसेवक सुहास कल्याणकर, सेनेच्या महिला जिल्हाप्रमुख अपर्णाताई नेरलकर, पं.स.चे गटविकास अधिकारी प्रविण सुरडकर, राजाराम सुर्यवंशी, माणिक भोसले, संजय कोठाळे, प्रकाश गीरे पाटील आदिंची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. कल्याणकर म्हणाले की, सौ. संध्याताई कल्याणकर यांनी राबविलेला चिद्रकला या रंग भरण स्पर्धेचा उपक्रम अतिशय स्तुत्य आहे. नांदेड उत्तर मतदार संघातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळायला हवे, यासाठी राज्य सरकारकडून निधीची कमतरता पडणार नाही. येणार्या पिढीला शिक्षकांनी चांगले संस्कार दिले पाहिजे, असे त्यांनी म्हणून इंग्रजी शाळा ग्रामीण भागातील नागरीकांना फिसमुळे परवडणार नाहीत त्यामुळे शासनाकडून निधी उपलब्ध करुन नांदेड उत्तर मतदार संघात डिजीटल शाळा उभारल्या जाणार आहेत. असे त्यांनी मत व्यक्त करुन मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची जबाबदारी शिक्षकांनी प्रभावी पार पाडावी असेही त्यांनी सांगीतले.

यावेळी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात सौ. संध्याताई कल्याणकर म्हणाल्या की, ५० जि.प. शाळेंनी यात सहभाग घेतला होता. जवळपास ३५०० विद्यार्थी यात सहभागी झाले. पहिली ते चौथी, पाचवी ते आठवी अशा दोन गटातील २५० शाळेंना बक्षिस दिले आहे. तसेच विशेष कार्य करणार्या ५० मुख्याध्यापकांचा गौरव केल्याचे सांगून मुले मोबाईलपासून दूर झाली पाहिजेत. देशाच भविष्य मुले आहेत. त्यांच्यासाठी हा उपक्रम राबविल्याचे त्यांनी सांगीतले. तर आ. श्रीजया चव्हाण या म्हणाल्या की, रंगभरण स्पर्धा हा उपक्रम स्तुत्य असून मुलांच्या विकासाला चालणा मिळणार असल्याचे त्यांनी सांगीतले. महापौर कविता मुळे यांनी उपक्रमाबद्दल कौतुक करुन मुलांच्या सुप्त गुणांना वाव मिळणारा हा उपक्रम आहे. शिक्षणासाठी आपण सदैव सहकार्य करणार असल्याचे त्यांनी सांगीतले.

अप्पर पोलिस अधिक्षक सुरज गुरव यांनी मुलांना शिक्षणात प्रेशर देवू नका, त्यांच्या आवडीच्या क्षेत्रामध्ये त्यांना प्रोत्साहन द्या, जिल्हा परिषदेच्या शाळांतून दर्जेदार शिक्षण मिळत आहे, मोबाईलच्या युगात ताईंनी मुलांच्या हातात ब्रश दिले आहे. ही कौतुकाची बाब असल्याचे त्यांनी सांगीतले. गटशिक्षणाधिकारी प्रविण चौंडकर यांनीही मत व्यक्त केले. जि.प.च्या प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाने या म्हणाल्या की, या स्पर्धेतील एक बक्षिस मुलांचे आयुष्य घडविते. मुलांच्या गुणवत्तेला वाव मिळतो असे म्हणत त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. तसेच मनपाच्या शिक्षणाधिकारी प्रविणा मांदळे यांनीही या उक्रमाचे कोतुक केले. कलाशिक्षक सुर्यवंशी यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सतीश कासेटवार यांनी केले, या बक्षिण वितरणाच्या कार्यक्रमाला मोठी गर्दी झाली होती. एकूणच हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

**संध्याताई कल्याणकर यांचे कौतुक**

सौ .संध्या ताई बालाजीराव कल्याणकर यांनी यापूर्वी अनेक उपक्रम राबविले आता त्यांनी शाळेतील मुलांसाठी रंग भरण स्पर्धा आयोजित करून मुलांच्या शालेय जीवनात वेगळा आनंद स्पर्धेच्या माध्यमातून निर्माण केला आहे त्यांनी आयोजित केलेल्या या उपक्रमाबद्दल आणि त्याला मिळालेला प्रचंड प्रतिसाद याकरिता विविध मान्यवरांनी सौ.संध्याताई कल्याणकर यांचे कौतुक केले.

# सिडकोत सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ संविधान वाचन आंदोलन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १९ जुलै -**



दिल्ली येथे चालू असलेल्या जंतर - मंतर वर उपोषण करते सोनम वांगचुक यांना असंविधानिक वागणूक पोलिसांनी दिल्यामुळे या प्रकरणी सोनम वांगचुक यांना सिडको येथील शिवाजी महाराज पुतळा परिसरात आंबेडकरवादी युवक सम्राट आढाव व मीत्रमंडळीनी दिनांक १९ ते २० जुलै रोजी संविधान वाचन आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

दल्ली येथील जंतर मंतर वर चालू असलेल्या उपोषणास असविधानिक रित्या सोनम वांगचुक यांना पोलिसांनी उचलून रुग्णालयात घेऊन जाणे व उपोषणाचे भंग करणे सदरील उपोषणावर दबाव टाकने,यावर सरकार कुठलीही भूमिका घेत नसुन उपोषणकर्ते सोनम वांगचुक यांच्या उपोषण स्मरणार्थ व असंविधानिक प्रकरणाच्या निषेधार्त, तसेच राष्ट्रीय शैक्षणिक पात्रता व प्रवेश परीक्षा (छएएढ) पेपर लीक प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी सोनम वांगचुक यांनी केलेल्या उपोषणाच्या समर्थनार्थ आणि दि. २० जुलै २०२६ रोजीच्या जंतर-मंतर ते लोकसभा संसद भवन दिल्ली दरम्यान आयोजित आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी सिडको येथे दोन दिवसीय दिनांक १९ ते २० जुलै रोजी संविधान वाचन आंदोलन चालु आहे.या आंदोलनाचे आयोजन आंबेडकरवादी युवक सम्राट आढाव व त्यांचे मित्र मंडळी यांच्या वतीने करण्यात आले आह. या आंदोलनात मोठ्या प्रमाणात महिला व युवक युती यांचा समावेश आहे. यावेळी या आंदोलनास प्रसेनजीत वाघमारे , विलास गजभारे, प्रा. प्रबुद्ध चित्ते, शाहीर बापूराव जमदाडे, प्रदीप हानवते, चंपतराव कांबळे, दीपक कदम, राजू सुताडे, साहिल बलसाने, अनिल मोरे, आकाश सोनकांबळे,

मनोज भरणे, आकाश चव्हाण, दीपक भरकड ,भगवान वाडे, विलास नागोरे, सतीश गजभारे, किरण सोनाळे, रामचंद्र जमदाडे, विनायक गायकवाड, कपिल झडते, सौ. सुजाता आढाव, सुनित गायकवाड, शोभा कसबे, उषा मोरे आदींनी संविधान वाचून आंदोलनास सुरुवात केली.

## माऊली ग्रुप चा सलग अकराव्या वर्षी अखंडीतपणे सेवायज्ञ

**हिमायतनगर**-माऊली मित्र मंडळ सेवाभावी ग्रुप नांदेडचा अतिशय स्तूत्य उपक्रम चालू असून सलग अकरा वर्षापासून सेवेधारी भाविकांच्या सेवेसाठी काम करीत आहेत. या वर्षी नव्याने वारकर्याच्या चरण सेवा ( मसाज ) चा उपक्रम चालू केला आहे.या सेवाभावी उपक्रमांमध्ये



हिमायतनगर शहर व तालूक्यातील असंख्य सेवाधारी मंडळी या सेवा यज्ञात सहभागी झाले आहेत. पंढपूर येथे आषाढी एकादशी निमित्त विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो भाविक,वारकरी मंडळी जात असतात. विशेषतः पायी वारीला येथे विशेष महत्व असते.आषाढी वारीच्या अखंड प्रवासात वारकर्याना शारीरीक थकवा जाणवतो. या करीता आवश्यक औषधोपचार या सह यावर्षी चरणस्पर्श अभ्यंग मसाज आयूर्वेदिक तेलाने पायाची मालिश व्यवस्थाही या वर्षी करण्यात आली आहे. सातारा जिल्ह्यातील फलटन येथे हे सेवाशिबीर ता. १५ ते १७ दरम्यान संपन्न झाले. वारकरी सेवा हिच इश्वर सेवा या माध्यमातून हा सेवाभावीयज्ञ समाजात मानवता,सेवाभाव आणि भक्तीचा संदेश देणारा ठरत आहे. या उपक्रमात समाजातील दानशूर व्यक्तीने दिलेल्या दानातून वारकर्याना भोजन,पाणि,आवश्यक त्या प्रामाणात औषधोपचार मिळत आहे.या उपक्रमात हिमायतनगर शहर,ग्रामीण क्षेत्रातून असंख्य सेवाधारी भाविकांनी सहभाग घेवून वारकर्याची मनोभावे सेवा केली आहे. या भक्तीमय उपक्रमाचे सर्वत्र कौतूक होत असून, सलग अकरा वर्ष अखंडीतपणे सेवा देणारया माऊली मित्र मंडळ ग्रूप येथे विशेष ठरला आहे.

## नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेसाठी अतुल वाघ यांना उमेदवारी जाहीर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ जुलै -**

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीमध्ये माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकरावचव्हाण पुरस्कृत शेतकरी विकास पॅनलच्या नांदेड तालुका अ गटासाठी अतुल वाघ यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.



राज्याची माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. या निवडणुकीत अकरा संचालक बिनविरोध निवडून आल्यानंतर उर्वरित जागांसाठी येथे २९ जुलै रोजी मतदान होणार असून या निवडणुकीत नांदेड तालुक्यातून अ गटातून शेतकरी विकास पॅनलचे तरुण उमेदवार अतुल वाघ यांना उमेदवारी देण्यात आली आहे . खासदार अशोकराव चव्हाण यांचा शेतकरी विकास पॅनल मधून अतुल वाघ यांच्या उमेदवारीने अ गटातील निवडणूक अत्यंत लक्षणीय ठरणार आहे किंबहुना वाघ यांचा विजय निश्चितपणे होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# हदगाव आगारात चार नवीन 'राजमाता जिजाऊ' बसेस दाखल

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १९ जुलै -**



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) हदगाव आगारात शनिवार, दि. १८ जुलै २०२६ रोजी चार नवीन 'राजमाता जिजाऊ' बसेस दाखल झाल्या. या बसेसचा लोकार्पण सोहळा हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे आ. बाबुराव कदम कोहळीकर यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या नव्या बसेसमुळे हदगाव आगाराच्या प्रवासी सेवेत मोलाची भर पडली असून ग्रामीण भागातील प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी व दर्जेदार प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नवीन बसेसचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या हस्ते फीत कापून बसेसचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी त्यांनी बसेसची पाहणी करून चालक-वाहकांशी संवाद साधला. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन व एसटी महामंडळ कटिबद्ध असून, नवीन बसेसचा लाभ सर्वसामान्य प्रवाशांना मोठ्या प्रमाणात होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी हदगाव आगाराचे आगार व्यवस्थापक आनंद धर्माधिकारी, प्रभारी अण्णा कदम यांच्यासह चालक, वाहक, यांत्रिक विभागातील कर्मचारी तसेच प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकार्पण सोहळ्यास भास्कर वानखेडे, बबनराव कदम, बबन माळुंदे, बालाजीराव दत्तात्रेय शिंदे, श्री वाकोडे, संदेश पाटील, गोपाल सारडा, कैलास बहादुरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, असंख्य प्रवासी बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा बँकेच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर आ. केराम सत्कार

**किनवट**-नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत महायुतीच्या समन्वयातून किनवट मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम यांची संचालकपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर रविवारी किनवट येथे त्यांच्या निवासस्थानी अभिनंदनाचा अक्षरशः वर्षाव झाला. विविध क्षेत्रातील मान्यवर, महायुतीतील घटक पक्षांचे



पदाधिकारी व कार्यकर्ते, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक तसेच नागरिकांनी पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या एकूण २३ संचालकांची निवड होत असून, त्यापैकी ११ संचालकांची बिनविरोध निवड झाली आहे. महायुतीचे ज्येष्ठ नेते तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या पुढाकाराने व महायुतीतील समन्वयातून अनेक जागांवर उमेदवारांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यामध्ये किनवट मतदारसंघातून आमदार भीमराव केराम यांची संचालकपदी बिनविरोध निवड झाली. बिनविरोध निवडीनंतर आ. केराम हे मागील दोन दिवस नांदेड येथे विविध शासकीय व सहकारी क्षेत्रातील बैठकींमध्ये व्यस्त होते. पावसाळी अधिवेशनातील कामकाज पूर्ण करून त्यांनी नांदेडमध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसंदर्भातील बैठकींना उपस्थिती लावली. त्यानंतर राज्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या उपस्थितीत झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सहभागी होत जिल्ह्याच्या विकासकामांबाबत चर्चा केली. याशिवाय पालकमंत्री सावे यांच्यासमवेत विविध कार्यक्रमांना व भेटींनाही त्यांनी उपस्थिती दर्शविली. रविवारी (दि. १९) आ. केराम किनवट येथील आपल्या निवासस्थानी परतल्यानंतर सकाळपासूनच शुभेच्छुकांची मोठी गर्दी झाली होती. महायुतीतील विविध घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सहकारी संस्थांचे प्रतिनिधी, व्यापारी, उद्योजक, पत्रकार, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच सर्वसामान्य नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. दिवसभर सत्काराचा सिलसिला सुरू असून, नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. किनवट तालुक्याच्या सहकार क्षेत्राच्या दृष्टीने ही निवड महत्त्वपूर्ण मानली जात आहे. माजी आमदार डी. बी. पाटील यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदाची जबाबदारी सांभाळल्यानंतर दीर्घ कालावधीनंतर किनवट तालुक्याला पुन्हा संचालकपदावर प्रतिनिधित्व मिळाले आहे. त्यामुळे तालुक्यातील सहकारी संस्था, शेतकरी व ग्रामीण विकासाशी संबंधित प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडले जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकरी, सहकारी संस्था आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी प्राधान्याने काम करणार असल्याची भावना आ. भीमराव केराम यांनी यावेळी व्यक्त केली. तसेच आपल्या निवडीबद्दल महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांचे, कार्यकर्त्यांचे आणि किनवट-माहूर मतदारसंघातील जनतेचे त्यांनी आभार मानले.

# उमरी नगर परिषद कडून घरकुल लाभार्थ्यांना धनादेशाचे वाटप



**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. १९ जुलै -**

उमरी नगरपरिषद कडून प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत उमरी नगर परिषद हद्दीतील एकूण १०५ घरकुल लाभार्थ्यांना यांना एक कोटी पाच लक्ष रुपये वितरित करण्यात आले आहे .

उमरी शहरातील घरकुल लाभार्थांना नगराध्यक्ष सौ शकुंतला भगवान मुदीराज, उपनगराध्यक्ष कैलासभाऊ देशमुख गोरठेकर,माजी नगराध्यक्ष प्रवीणभाऊ सारडा यांच्या हस्ते निधी वितरीत करण्यात आला.

यावेळी गटनेते राजेश पाटील जाधव, बांधकाम सभापती संदीप चंदनवार महिला व बालकल्याण सभापती निकिता सिंगरवाड, नियोजन सभापती विष्णूभाऊ पंडित व सदस्य अनुसयाबाई कटकदवने ,साईनाथ जमदाडे ,गजानन अलसटवार, रतन खंदारे बाबू बेग हुसेन बेग, एजास खान, गजानन खांडरे, इरबा शेळके,वसीम कुरेशी,अशोक झडते,शंकर शिंदे,अनंत रापणवाड, विकी रणनवरे,दीपक खांडरे, जावेद खान,नगरसेवक प्रतिनिधी,कार्यालयीन अधीक्षक कांचन पडलवार , अभियंता कैलास यमलवाड, लेखापाल बालाजी चवरे, संगणक अभियंता सावंत सर, पूजा पावडे,घरकुलाचे अभियंता शकील पठाण, वरिष्ठ लिपीक गणेश मदने,विठ्ठल गगरोड,सचिन गंगासागरे ,गंगाधर पवार , चंद्रकांत श्रीकांबळे ,गौतम सोनफळे, शमीन बेग,आकाश खंदारे,रमाबाई करपे,माधव जाधव,यावेळी उपस्थित होते .

# ऑनलाइन तक्रार प्रक्रियेमध्ये शेतकरी अधिकच अडचणीत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ जुलै -**

कोरड्या दुष्काळाच्या छायेत असताना हळद पुनर्रचित हवामान आधारित पीकविमा योजनेत जोखमीनुसार तक्रारीची तरतूदच नाही, कंपनीने ईमेलचा फार्मेट बनवला आहे, त्यानुसार ते स्वीकारते. तसेच एक १४४४७ या कंपनीच्या तक्रार फोनवर पावसाच्या खंडाची नुकसानीची नोंद घेण्याची योग्य पद्धतच कार्यारत नाही, सुशासन, प्रशासन व विमा कंपनीकडून अनास्था दूर करून शेतकर्याला न्याय देण्यात यावा, या मागण्यांचे निवेदन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे यांनी पाठविले आहे.

अनुशेषग्रस्त, कोरडा दुष्काळग्रस्त सोनखेड, शेवडी मंडळ ता. लोहा तसेच संपूर्ण नांदेड जिल्हा कोरड्या दुष्काळाच्या गर्द छायेमध्ये आहे. विहिरीचे, बोअरचे पाणी कमी झाले आहे. सोयाबीन जमिनीच्या बाहेर निघाले नाही, हळदीचे संपूर्ण प्रमाणात नुकसान झालेले आहे. बदलत्या हवामानामध्ये शेतकर्यांना आर्थिक संरक्षण देण्याकरता आर्थिक स्थायीत निर्माण करून देण्याकरिता या व्यापक उद्देशाने प्रधानमंत्री पीकविमा योजना निर्माण करण्यात आली. पीक संरक्षणाकरता विविध प्रकारच्या विमा योजना निर्माण करण्यात आल्या. त्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि पुनर्रचित हवामानावर आधारित पीकविमा योजना कोरड्या दुष्काळाच्या छायेत असलेल्या शेतकर्याला यातून आर्थिक संरक्षण मिळेल, परंतु हळद पिकाच्या जोखमीचा कालावधी, पावसाचा खंड १५ जुलैला संपतो, परंतु त्याच संदर्भात तक्रार करण्याची योग्य व सोपी पद्धत नसल्यामुळे शेतकरी अडचणीत आला. तसेच विमा कंपनीने प्रचार-प्रसार करण्यासाठी ईमेल दिला आहे, परंतु त्या अॅड्रेसवर ई-मेल केल्यानंतर योग्य फॉरमॅटमध्येच तो अर्ज आला पाहिजे, अशी अट घातली आहे. भोळ्या, भाबड्या शेतकर्याला याबाबत काहीच करता येत नाही, सेवा केंद्रावर तक्रार करायला गेले तर १४४४७ वर एक दिवस सांगा म्हणतात. नुकसानीचा, पावसाचा खंड हा एका दिवसाचा नाही, पंधरा दिवसाच्या नुकसानीच्या शासन निर्णयानुसार आहे व त्याची तक्रार करणे शेतकर्याला तीन दिवसात बंधनकारक केले आहे आणि त्या ठिकाणी सेवा देणारा कर्मचारी हे मान्य करायला तयार नाही, अशा अडचणीमध्ये शेतकरी अडकले आहेत. यातून प्रशासनाची व विमा कंपनीची उदासीनता समोर येत आहे. या जागतिकीकरणाच्या काळामध्ये नागरी समाज म्हणून व बिगर राजकीय अभिकर्त म्हणून शासन आणि नागरिकांनी महत्त्वाची भूमिका घेण्यात आवश्यक आहे तसेच ऑनलाईन पीक पाणी अॅपसुद्धा चालत नाही, अशा अनेक तक्रारी भागातून येत आहेत.

तरी या ऑनलाइन व पीकविमा प्रशासनातील शेतकर्यांसंदर्भातल्या अडचणी दूर करून शेतकर्याला न्याय द्यावा. तसेच शेतकर्यांची तक्रार करण्याचा अधिकार सुरक्षित ठेवावा, ई-मेल तसेच सेवा नंबरवर तक्रारी जोखीमीनुसार स्वीकारण्यास विमा कंपनी व प्रशासनाला आदेश द्यावेत, असेही निवेदनात म्हटले आहे.

# शेतकऱ्यांच्या वेदनेशी एकरुप होत श्रावण भिलवंडे यांचा वाढदिवस साधेपणाने साजरा

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १९ जुलै -**

नरसी येथील श्री तुळजाभवानी जिनिंग फेडरेशनचे चेअरमन तथा भारतीय जनता पक्षाचे माजी जिल्हा सरचिटणीस श्रावण पाटील भिलवंडे यांचा वाढदिवसानिमित्त आयोजित अभिष्टचिंतन सोहळा रविवारी त्यांच्या नरसी येथील 'नंदनवन' निवासस्थानी अत्यंत साधेपणाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्यास भाजप कार्यकर्त्यांसह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि हजारो नागरिक उपस्थित होते.



यंदा तालुक्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने खरीप पिकांवर संकट ओढवले असून शेतकरी चिंतेत आहेत. या परिस्थितीचे भान ठेवत श्रावण पाटील मित्रमंडळाने गेल्या अनेक वर्षांपासूनची वाढदिवस साजरा करण्याची पारंपरिक पद्धत बाजूला ठेवून यंदाचा अभिष्टचिंतन सोहळा अत्यंत साधेपणाने साजरा करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाचे उपस्थितांनी स्वागत केले.

यावेळी नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर बिनविरोध निवडून आलेले नवनिर्वाचित संचालक श्रीनिवास पाटील चव्हाण यांचाही शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

अभिष्टचिंतन स्वीकारताना श्रावण पाटील भिलवंडे यांनी शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात अनावश्यक उत्सव टाळणे हीच सामाजिक बांधिलकी असल्याचे सांगितले. मित्रमंडळाने घेतलेल्या साधेपणाच्या निर्णयाचे त्यांनी कौतुक करत उपस्थित सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.

कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली. तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या कार्यकर्ते, हितचिंतक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण परिसर उत्साहाने फुलून गेला. विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती ही श्रावण पाटील भिलवंडे यांच्या सर्वसमावेशक नेतृत्वाला मिळालेल्या व्यापक स्वीकाराची साक्ष देणारी ठरली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जंगलातांडा येथे नशा मुक्ती व बालविवाह प्रतिबंध विषयक जनजागृती कार्यक्रम संपन्न



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.१९ जुलै :** तालुक्यातील जंगलातांडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नशा मुक्ती व बालविवाह प्रतिबंध कायद्याविषयी जनजागृती करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी सोयगाव येथील लोककलावंत तसेच समाजसेवक विष्णू मापारी यांनी उपस्थित राहून प्रभावी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमादरम्यान मापारी यांनी नशेचे दुष्परिणाम,त्यातून होणारे शारीरिक व मानसिक नुकसान याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच बालविवाह हा कायद्याने गुन्हा असून त्याचे समाजावर होणारे दुष्परिणाम स्पष्ट करत,मुलांच्या शिक्षणावर होणारा परिणामही त्यांनी विद्यार्थ्यांना आणि उपस्थितांना समजावून सांगितला.त्यांनी लोककला,संवाद आणि उदाहरणांच्या माध्यमातून जनजागृती अधिक प्रभावीपणे केली.या प्रसंगी शाळेतील मुख्याध्यापक रामदास फुसे सह सर्व शिक्षक उपस्थित होते.तसेच गावातील माजी सरपंच,प्रतिष्ठित नागरिक व पालकवर्ग यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करत अशा कार्यक्रमांची आवश्यकता व्यक्त केली.कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये व ग्रामस्थांमध्ये नशा मुक्ती व बालविवाह प्रतिबंधाबाबत जागरूकता निर्माण झाली असून,समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी हा उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.

## जंतर मंतर च्या घटनेचा पैठणला निषेध



तभा वृत्तसेवा

**पैठण दि १९ :-** नीट पेपर फुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षा मंत्री हेमंत प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी दिल्लीच्या जंतर मंतर मैदानावर कॉक्रोज जनता पार्टीने पुकारलेल्या आंदोलनात गेल्या २१ दिवसांपासून आमरण उपोषणाला बसलेले सायंटिस्ट सोनम वांनचूक यांना शनिवार १९ जुलै च्या भल्या पहाटे दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतल्या प्रकरणी या भ्याड कारवाईचा निषेध पैठणच्या छत्रपती शिवाजी महाराज स्मारका समोर करण्यात आला.

कॉक्रोज जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी नीट पेवर फुटीप्रकरणी झालेल्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्यासाठी सरकारला जबाबदार धरत केंद्रीय शिक्षण मंत्री प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी दिल्लीच्या जंतर मंतर मैदानावर गेल्या महिन्यापासून चक्री उपोषण सुरु केले होते. याठिकाणी लद्दाखचे पर्यावरण प्रेमी सायंटिस्ट सोनम वांनचूक यांनी आंदोलनात सहभागी होऊन गेल्या २० दिवसांपासून आमरण उपोषण सुरु केली होते.हे आंदोलन अंतिम स्वरूपात येतांना सोनम वांनचूक यांना दिल्ली पोलिसांनी बळजबरीने ताब्यात घेऊन उपचारासाठी रुग्णालयात पाठवल्याची चित्र असतांना या घटनेचा पैठण मध्ये निषेध करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासमोर. दिल्ली पोलिसांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी सोमनाथ निकाळजे, कामगार नेते विष्णू बोडखे, साईनाथ पा. कर्डीले, अनिल पा. राऊत. राजेंद्र उगले,माऊली पा. मुळे, सुभाष नवथर आदींचा आंदोलनात सहभाग होता .

## राजेंद्र पगारे यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात



**कन्नड :**दि.१९ जुलै - पंचायत समिती कन्नड येथे ग्रामपंचायत अधिकारी राजेंद्र पगारे यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. नियत वयोमानानुसार ३० जून २०२६ रोजी ते सेवानिवृत्त झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रहार ढोकणे होते. प्रमुख उपस्थितीत गटविकास अधिकारी ओमप्रकाश रामावत, जिल्हा परिषद सदस्य आण्णासाहेब शिंदे, किशोर पवार, पंचायत समितीच्या उपसभापती माया सुरासे, जिल्हाध्यक्ष भिमराज दाणे, सचिव तथा विस्तार अधिकारी प्रविण नलावडे, संतोष दारकुंडे, शेख, पवार यांच्यासह तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच आणि कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी आण्णासाहेब शिंदे यांनी राजेंद्र पगारे यांनी सेवाकाळात केलेल्या कामाचा आढावा घेत त्यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले. किशोर पवार यांनी विविध विकासकामांमध्ये त्यांनी दिलेल्या योगदानाचा उल्लेख केला. भिमराज दाणे यांनी पगारे यांनी सेवाकाळात पंचशील व त्रिशरणाच्या विचारांचा अंगीकार करून कार्य केल्याचे सांगितले. यावेळी प्रविण नलावडे, काळे, जंजाळ, सी. आर. पवार, कुंवर यांच्यासह विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत पगारे यांच्या कार्याचा व सहकार्याचा उल्लेख केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साईनाथ जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी योगेश धाटबळे, काळे, साईनाथ जाधव तसेच पंचायत समितीतील ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# गंगापूर शहरात नागरिकांना स्वच्छ पाणी मिळणार जलशुद्धीकरण केंद्र कार्यान्वित

## नगराध्यक्ष संजय जाधव यांची पत्रकार परिषदेत माहिती

तभा वृत्तसेवा .

**गंगापूर दि.१९:** लोकनियुक्त नगराध्यक्ष संजय जाधव यांना पदावर येउन् सहा महीने नुकतेच पूर्ण झाले असून या अल्पकाळामध्ये त्यांनी निवडणुक काळामध्ये नागरिकांना मुलभूत प्रश्न सोडवण्याच्या दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी आ. सतीश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व आ. प्रशांत बंब व खा. संदीपान भुमरे यांच्या सहकार्याने नागरिकांना मुलभूत प्रश्न सोडवण्याच्या दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यात यश आले आहे .

आगामी काळात स्वच्छ, सुंदर व आदर्श शहर करण्यासाठी नगराध्यक्ष संजय जाधव,





> गंगापूर शहर विकासाची कामे करीत असताना कोणताही दुजाभाव न करता समाज घटकांना सोबत घेऊन सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न असून नागरिकांनी सहकार्य करावे नळांना तोट्या बसवून पाण्याची नासाडी होऊ नये यासाठी देखील खबरदारी घ्यावी असे आवाहन त्यांनी केले आहे.
>
> **- संजय जाधव -नगराध्यक्ष**

मुख्याधिकारी, उपनगराध्यक्ष व त्यांचे सर्व नगरसेवक परिश्रम घेत आहेत.

सध्याच्या जॅकवेल, मोटारींची दुरुस्ती व क्षमता वाढवण्याबरोबरच कायगाव येथील रामेश्वर मंदिर परिसरातील गंगापूर कारखान्याची बंद पडलेली उपसा जलसिंचन विहीर ताब्यात घेउन त्या ठिकाणाहून स्वतंत्र पाईप लाईन टाकून शहरवासियांना मागील काळात दहा पंधरा दिवसाला मिळणारे पाणी दोन दिवसाआड पाणी देण्यासाठी जलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वित करण्यात आली आहे.

शहराची वाढणारी लोकसंख्या लक्षात घेउन् नागरिकांना दररोज व शुध्द पाणी देण्याच्या दृष्टीने नवीन पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव देखील तयार करण्यात आला असून त्यासंबंधीची बैठक उपमुख्यमंत्री सौ. सुनेत्राताई पवार यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संबंधित विभागांचे प्रमुख यांच्या उपस्थितीत मंगळवार दि.२१ जुलै रोजी मुंबईत होणार आहे.

नगराध्यक्ष संजय जाधव यांनी पदभार स्वीकारल्यानंतर शहरातील मुख्य रस्त्यावरील पथदिवे कार्यान्वित करण्यात आले, नाल्यांची सफाई करण्यात येऊन कचरा उचलण्यासाठी घंटागाड्यांची सेवा अधिक कार्यक्षम करण्यात आली. नगरपरिषद हद्दीतील रस्त्याच्या दुभाजकावर वृक्षारोपण व उद्यानाचे सुशोभीकरण करून जास्तीत जास्त झाडे लावण्याचे काम प्रगतीपथावर आहे शहरातील विकास कामांसाठी जिल्हा नियोजन समितीकडून सहा कोटी निधी व राज्य शासनाच्या भांडवली निधीतून दहा कोटींचा निधी मिळवण्यात यश आले आहे यातून शहराचा विकास करण्यात येणार असल्याचे संजय जाधव यांनी म्हटले आहे.

# 'देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताह' अंतर्गत एक हजार विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

### शिशु विहार शाळेतील कार्यक्रमात कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांची प्रमुख उपस्थिती; शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा संदेश

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताह' अंतर्गत शिशु विहार शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देत शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना आवश्यक



शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले तसेच त्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी भाजपचे शहर-जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, महापौर समीर राजूरकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे सभापती अनिलभैय्या मकरीये यांच्या पुढाकाराने करण्यात आले.

मान्यवरांनी आपल्या मनोगतात शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगत, समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करणे ही सामाजिक बांधिलकी असल्याचे नमूद केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयीची प्रेरणा वाढते आणि त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक बळ मिळते, असेही त्यांनी सांगितले.

'देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताह' अंतर्गत शहरातील शिशु विहार शाळा, गुजराती विद्या मंदिर आणि मनपा प्राथमिक शाळा येथे एकूण १,००० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी स्वागत करत आयोजकांचे आभार मानले.

## जिल्हा मध्यवर्ती बँक संचालक पदी निवडून आल्याबद्दल प्रभाकर आबा काळे यांचा सत्कार



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.१९ जुलै :** जिल्हा मध्यवर्ती बँक छत्रपती संभाजीनगरच्या संचालक पदी निवडीबद्दल प्रभाकर (आबा) काळे यांचा म.रा.प्रा शिक्षक संघ व श्री अमृतेश्वर शिक्षक पतसंस्था सोयगाव व तथा जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव यांचे वतीने सोयगाव शहरातील भैरवनाथ पतसंस्था येथे सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी श्री अमृतेश्वर शिक्षक पतसंस्था सोयगावचे चेअरमन व संचालक मंडळ,शिक्षक संघ पदाधिकारी,जिल्हा परिषद प्रशाला मुख्याध्यापक व सर्व शिक्षक मित्र परिवार यांची उपस्थिती होती. अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा दिल्या

## मच्छी मार्केट परिसरातून चोरीची दुचाकी जप्त; संशयित ताब्यात

तभा वृत्तसेवा

कन्नड - दि.१९ जुलै - कन्नड शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मच्छी मार्केट परिसरात चोरीची दुचाकी असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत चोरीची मोटारसायकल जप्त केली. या प्रकरणी एका संशयितास ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश दिंडे व पोलीस उपनिरीक्षक केसरसिंग जारवाल यांना मच्छी मार्केट परिसरात चोरीची दुचाकी असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक केसरसिंग जारवाल पोलीस अंमलदार सागर सुलाने हे घटनास्थळी रवाना झाले.

पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता एक इसम संशयास्पदरीत्या दुचाकीसह फिरताना आढळला. त्याची चौकशी केली असता त्याने आपले नाव निखिल गायकवाड (रा. हिनानगर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर) असे सांगितले. त्याच्याकडील होंडा शाईन (क्रमांक MH-20-EW-0598) या मोटारसायकलीबाबत समाधानकारक माहिती देता आली नाही.

यानंतर वाहनाची ऑनलाइन पडताळणी केली असता सदर मोटारसायकल चोरीची असून तिच्याबाबत सिडको पोलीस ठाणे, छत्रपती संभाजीनगर येथे दि.०९ जून रोजी गुन्हा क्रमांक 377/2026 दाखल असल्याचे निष्पन्न झाले. याबाबत सिडको पोलीस ठाण्याशी संपर्क साधून माहिती देण्यात आली असून पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश दिंडे, पोलीस उपनिरीक्षक केसरसिंग जारवाल आणि पोलीस अंमलदार सागर सुलाने यांनी केली.

## वैज्ञानिक तपासणीपूर्वी बीज कंपन्यांवर कारवाई टाळावी : SIAM

### सोयाबीन तक्रारींवर निष्पक्ष व विज्ञानाधारित चौकशीची मागणी

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** सीड इंडस्ट्रीज असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (SIAM) ने राज्यातील सोयाबीन पिकाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी गंभीर असल्याचे मान्य करत, शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण ही शासनाची सर्वोच्च जबाबदारी असल्याचे म्हटले आहे. मात्र, कोणत्याही तक्रारीची वैज्ञानिक तपासणी पूर्ण होण्यापूर्वीच बीज कंपन्यांविरुद्ध गुन्हे दाखल करणे किंवा दंडात्मक कारवाई करणे हे 'Ease of Doing Business' च्या तत्त्वांना बाधा देणारे असल्याची भूमिका संघटनेने मांडली आहे.

SIAM च्या प्रसिद्धीपत्रकानुसार, बियाण्याची उगवण आणि पिकाची वाढ ही केवळ बियाण्याच्या गुणवत्तेवर अवलंबून नसून पाऊस, जमिनीतील ओलावा, पेरणीची वेळ, मातीचा प्रकार, हवामान तसेच शेतातील व्यवस्थापन यांसारख्या अनेक घटकांवर अवलंबून असते. त्यामुळे कोणत्याही निष्कर्षापूर्वी तज्ज्ञ समितीमार्फत सखोल व वैज्ञानिक तपासणी होणे आवश्यक असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

भारत सरकारने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली 'Ease of Doing Business', उद्योगस्नेही वातावरण, संशोधनाला प्रोत्साहन आणि पारदर्शक प्रशासनाला प्राधान्य दिले आहे. बीज उद्योग हा संशोधनाधारित उद्योग असून नवीन वाण विकसित करण्यासाठी अनेक वर्षांचे संशोधन, मोठी गुंतवणूक आणि कठोर नियामक प्रक्रिया आवश्यक असते. वैज्ञानिक निष्कर्षांशिवाय होणारी कठोर कारवाई उद्योगातील गुंतवणूक, संशोधन आणि नव्या तंत्रज्ञानाच्या विकासावर विपरीत परिणाम करू शकते. तसेच ही भूमिका Seeds Act च्या भावनेलाही बाधा पोहोचवणारी ठरू शकते, असे SIAM ने नमूद केले आहे.

संघटनेने महाराष्ट्र शासनाकडे प्रत्येक तक्रारीची स्वतंत्र, निष्पक्ष व विज्ञानाधारित तपासणी करण्याची, हवामान व इतर कृषी घटकांचा सखोल विचार करण्याची, वैज्ञानिक निष्कर्ष येण्यापूर्वी फौजदारी कारवाई टाळण्याची तसेच शेतकरी, कृषी विद्यापीठे, कृषी तज्ज्ञ आणि बीज उद्योग यांच्या समन्वयातून वस्तुनिष्ठ निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

SIAM ने शेवटी स्पष्ट केले की, शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी आणि प्रत्येक वैध चौकशीत संपूर्ण सहकार्य करण्यासाठी संघटना कटिबद्ध आहे. शेतकरी आणि बीज उद्योग यांचे हित जपणारी, विज्ञानाधारित, न्याय्य व संतुलित भूमिका महाराष्ट्र शासनाने घ्यावी, अशी अपेक्षाही संघटनेने व्यक्त केली आहे.

# तमाशा कलावंतांचे जगणं मांडणाऱ्या 'फड' माहितीपटाचे प्रदर्शन

**छत्रपती संभाजीनगर, दि. १८ :** मराठवाडा आर्ट, कल्चर अँड फिल्म फाऊंडेशनतर्फे आयोजित अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या 'राऊंड द इयर' उपक्रमाअंतर्गत सुरू असलेल्या तीन दिवसीय डॉक्युमेंट्री फेस्टिव्हलच्या दुसऱ्या दिवशी 'फड' या माहितीपटाचे प्रदर्शन एमजीएम विद्यापीठाच्या स्कूल ऑफ फिल्म आर्ट्समधील व्ही. शांताराम प्रेक्षागृहात उत्साहात पार पडले. या उपक्रमासाठी एमजीएम विद्यापीठाच्या स्कूल ऑफ फिल्म आर्ट्स तसेच कॉलेज ऑफ कम्युनिकेशन, कल्चर अँड मीडिया यांचे विशेष सहकार्य लाभले.

या प्रसंगी पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, माहितीपटाचे दिग्दर्शक धनंजय यमुना अहिराणी, अॅड.एस. के. कदम, माजी कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे, डॉ. आनंद निकाळजे, डॉ. रेखा शेळके, डॉ. शिव कदम, प्रशांत पवार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. 'अ महाराष्ट्रियन फोक आर्ट' प्रस्तुत 'फड' हा माहितीपट महाराष्ट्राच्या सुमारे २५० ते ३०० वर्षांच्या समृद्ध तमाशा परंपरेवर आणि त्या कलेसाठी आयुष्य वेचणाऱ्या कलावंतांच्या संघर्षमय जीवनावर आधारित आहे. पिढ्यान्‌पिढ्या तमाशाची परंपरा जपणाऱ्या कलाकारांचे जीवन, त्यांचे अनुभव, त्याग आणि कलेप्रती असलेली निष्ठा या माहितीपटातून प्रभावीपणे मांडण्यात आली आहे. कांताबाई सातारकर, रघुवीर खेडकर, मनोहर अहिरे, विलास शिंदे, प्रभाकर शिंदे, संभाजी कोल्हे, अशोक क्षीरसागर, देवा मोरे, विलास वाघमारे, नयना भोसले, सारा भोसले, नंदा बेर्डे, कृष्णा निकम, अनिल माने, गणेश बांगर, दीपक सोनवणे यांच्यासह अनेक कलावंतांनी आपल्या आयुष्यातील अनुभव आणि तमाशा कलेविषयीच्या भावना यामध्ये व्यक्त केल्या आहेत.

माहितीपटानंतर आयोजित चर्चासत्रात दिग्दर्शक धनंजय यमुना अहिराणी यांनी तमाशा कलेबाबत समाजात निर्माण झालेल्या गैरसमजांवर भाष्य केले. बालपणापासून तमाशा जवळून अनुभवला असल्याचे सांगत त्यांनी, चित्रपटांमधून सादर होणारी तमाशाची प्रतिमा आणि प्रत्यक्ष वास्तव यात मोठी तफावत असल्याचे नमूद केले. तमाशा कलेचे खरे स्वरूप आणि त्यामागील कलावंतांचे संघर्षमय जीवन समाजासमोर आणण्यासाठी माहितीपट हे माध्यम निवडल्याचे त्यांनी सांगितले. बदलत्या काळात रसिकांची अभिरुची, व्यावसायिक गरजा आणि आधुनिक माध्यमांच्या प्रभावामुळे तमाशाच्या सादरीकरणात बदल होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. डीजे लावणीसारख्या प्रवृत्तीमुळे पारंपरिक तमाशाचे स्वरूप बदलत असून, नव्या पिढीचा या कलेकडे ओढा कमी होत चालल्याचे त्यांनी सांगितले.

# शिक्षकांना नव्हे सुशिक्षित बेरोजगारांच्या संधी द्या!

राज्यातील शिक्षण व्यवस्थेसमोर सध्या एक गंभीर प्रश्न उभा आहे. एका बाजूला विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी शासन विविध योजना राबवत आहे, तर दुसऱ्या बाजूला त्याच शिक्षकांना बीएलओ, एसआयआर, जनगणना, सर्वेक्षण आणि इतर प्रशासकीय कामांमध्ये गुंतवून वर्गापासून दूर ठेवले जात आहे. परिणामी, विद्यार्थ्यांचे नियमित अध्यापन विस्कळीत होत असून त्याची मोठी किंमत विद्यार्थ्यांच्या भविष्याला मोजावी लागत आहे.

शिक्षक हा केवळ सरकारी कर्मचारी नसून तो समाजाचा ज्ञानदूत आहे. त्याचे प्रमुख कर्तव्य विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हे आहे. मात्र, वारंवार अशैक्षणिक कामांसाठी नियुक्ती केल्याने अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होत नाही, विद्यार्थ्यांच्या शंकानिरसनासाठी वेळ मिळत नाही आणि मूल्यमापन प्रक्रियाही प्रभावित होते. विशेषतः ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचे सर्वाधिक नुकसान होऊन ते दर्जेदार शिक्षणापासून वंचित राहत आहेत.

याचवेळी राज्यात लाखो सुशिक्षित बेरोजगार तरुण रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत. शासनाने त्यांना आवश्यक प्रशिक्षण देऊन बीएलओ व इतर प्रशासकीय कामांमध्ये करार तत्त्वावर किंवा मानधनावर संधी दिल्यास एकाच वेळी दोन प्रश्न सुटू शकतात. विद्यार्थ्यांना नियमित शिक्षक मिळतील आणि बेरोजगार युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल.

शिक्षण हा कोणत्याही राष्ट्राच्या विकासाचा पाया आहे. त्या पायालाच कमकुवत करणारे निर्णय भविष्यासाठी घातक ठरू शकतात. त्यामुळे शासनाने शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून तातडीने मुक्त करून स्वतंत्र यंत्रणा उभारावी. विद्यार्थ्यांचे हित, शिक्षकांचा सन्मान आणि बेरोजगारांच्या रोजगाराचा प्रश्न या तिन्ही बाबींचा समतोल साधणारा हा निर्णय ठरेल.

*शिक्षक हा राष्ट्रनिर्माता असतो; त्याला वर्गाबाहेर ठेवणे म्हणजे राष्ट्राचे भविष्य वर्गाबाहेर ठेवणे होय.*

*देशाचे भविष्य वर्गात घडविणाऱ्या शिक्षकांच्या हातात मतदार याद्या आहेत ही शोकांतिका आहे.*



आज शिक्षण व्यवस्था एका गंभीर वळणावर उभी आहे.

*शिक्षकाचे पहिले आणि सर्वोच्च कर्तव्य म्हणजे विद्यार्थ्यांना ज्ञानदान करणे.*

वर्गातील प्रत्येक तास विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अमूल्य क्षण असतो. तोच वेळ जर अशैक्षणिक कामांमध्ये खर्च झाला, तर त्याची भरपाई कोण करणार?

*निवडणुका पुन्हा होतील, याद्या पुन्हा तयार होतील; पण विद्यार्थ्यांच्या आयुष्यात गेलेला तास कधीच परत येणार नाही.*

राज्यात लाखो सुशिक्षित बेरोजगार तरुण रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत. त्यांना आवश्यक प्रशिक्षण देऊन बीएलओ व इतर प्रशासकीय कामांमध्ये संधी दिल्यास शिक्षक अध्यापनावर पूर्ण लक्ष केंद्रित करू शकतील आणि बेरोजगारांनाही रोजगार मिळेल. हा निर्णय शिक्षण आणि रोजगार या दोन्ही क्षेत्रांसाठी लाभदायक ठरेल.

शिक्षकांचा वेळ विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवणे व प्रशासनासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करणे अत्यंत आवश्यक आहे.

शासनाने शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देत शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करावे. कारण...

शिक्षक वर्गात असेल तरच विद्यार्थी घडेल; विद्यार्थी घडला तरच देश घडेल.

**- अनिता चव्हाण-राठोड**
**कै. गुरुदयालसिंग राठोड प्रा. माध्य व उच्च माध्य आश्रमशाळा, गराडा, कन्नड, छत्रपती संभाजीनगर**